# श्रीसाईलीला



विजयादशमी विशेषांक    किं. ५० पैसे    ऑक्टोबर १९६४

स्थापना १९१६



साईबाबांच्या

मूर्ती पूजेचीं भांडीं

व

चांदीचे

सोन्याचे

मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासु सुप्रसिद्ध पेढी

## ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६२१



# श्री साई वाक्सुधा

भावभक्तीशिवाय सर्व व्यर्थ आहे. तुम्हीं कितीही ज्ञानसंपन्न असा, वेदाध्ययन, उपनिषदांचें पारायण किंवा इतर पारायणें कितीही केलेलीं असलीं तरी भक्तीचा ओलावा जर तुमच्या ठायीं नसेल तर देवाची भेट होऊं शकणार नाहीं. भजन. पूजन, तीर्थाटण तुम्हीं कितीही करा. तेथें जर खऱ्या भक्तिभावाचा ओलावा नसेल, तुमच्याठायीं भक्तीचा प्रेमळपणा नसेल तर सारें व्यर्थ आहे. भक्तीशिवाय दुसऱ्या कोणत्याही साधनानें तुम्हीं देव जवळ आणूं शकणार नाहीं.

— श्रीसाईसच्चरित्

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४३ वें ]     ऑक्टोबर १९६४     [ अंक ७ वा

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

प्रत्येक मनुष्याच्या ठायीं कांहीं ना कांहीं दुर्गुण दबा धरून राहिलेले असतात. कित्येकास त्यांची जाणीव असते तर कित्येकास ती नसते. ज्यांना जाणीव होते ते धन्य होत. परंतु केवळ जाणीव होऊनही तिचा कांहीं उपयोग होत नाहीं. जे दुर्गुण उमगतील त्याची हकालपट्टी करण्यासाठी कंबर कसणें, त्यांच्यावर सक्त पहारा ठेवणें व घडोघडी त्यांच्यापासून दूर दूर राहण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. 'रात्रदिवस आम्हां युद्धाचा प्रसंग' असें संतांनी म्हटलें आहे ते याच झगड्याला उद्देशून होय.

या जगांत कोणाला रूप लावण्याचा, कोणाला संपदेचा तर कोणाला अधिकाराचा अहंकार असतो. अहंकाराशिवाय माणूस सांपडणें विरळा. अहंकार मग तो कोणत्याही कारणामुळें शरीरांत शिरलेला असो. तो हानिकारक होय. रूपलावण्य काय, वैभव काय, किंवा अधिकार काय ? त्यांपैकीं एकाला तरी शाश्वती आहे काय ? तीं कधीं नाहींशी होतील तें समजणारही नाहीं. मग त्यांच्याबद्दल अहंकार कां बरें बाळगायचा ?

फळभारानें वृक्ष कसें लवतात, त्याचप्रमाणें एखाद्या अनन्य साधारण गोष्टीची जोड ईशकृपेनें आपल्या वाट्यास आली असतां आमची मान अहंकारानें ताठ कां व्हावी ? त्यामुळें आम्हीं कां बरें नम्रतेनें वाकूं नये ? हा दोन घडीचा डाव आहे असें समजून व ती देवकृपा मानून आम्हीं श्रीसाई चरणीं लीन कां होऊं नये ! कारण तोच देणारा व आणि तोच नेणारा. त्याची कृपादृष्टि आपल्यावर सदासर्वकाळ असावी. त्याच्या कृपेला आम्हीं सदैव पात्र व्हावें यासाठीं त्याचें स्मरण करून त्या स्मरणाच्या सात्त्विक आनंदात आम्हीं घटका, दोन घटका कां बरें घालवूं नयेत ?

अहंकाराचा तोरा फार वाईट ! जेव्हां अहंकाराचा अंगार डोकें वर करील त्या त्यावेळीं त्यांत आम्हीं जळून जाऊं नये यासाठीं संरक्षक कवच या नात्यानें आम्हीं श्रीसाईबाबांचें स्मरण करावें. त्यांना शरण जावें म्हणजे त्या बाधेपासून आपली सुटका झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

आम्हांला मनुष्य जन्माला येऊन माणूस बनायचें आहे. जन्म माणसाचा मिळाला असला तरी माणुसकीला शोभणारे गुण आपल्यांत आहेत कां ? याचा आम्हीं शोध घेतला पाहिजे, तो घेत असतां आपणांस काय बरें बोध होतो. ? माणसाला न शोभणारे परंतु एखाद्या सैतानाला किंवा अधम माणसाला शोभणारे किती तरी दुर्गुण आमच्यांत राजरोसपणें वास करीत आहेत !

आम्हीं नाना प्रकारच्या उद्योगांत व संशोधन कार्यांत गुंतलेले असतो, परंतु स्वतः आपण कोण आहोंत, आपल्याठायीं दुर्गुणांचा किती मळ सांचलेला आहे व तो साफ करून टाकण्यासाठी आपण झटलें पाहिजे. या गोष्टीची जाणीव आयुष्य संपायला आलें व निजधामास जाण्याची वेळ येऊन ठेपली तरी आपणांस होत नाहीं.

या जाणीवेच्या छत्राखाली जो जीवन कंठील, उठतां बसतां जो आपल्या दुर्गुणांवर सक्त पहारा ठेवील त्याचेंच पाऊल अध्यात्म मार्गाच्या दिशेनें पुढें पुढें पडत जाईल.

आमच्यापैकीं प्रत्येकाला त्या मार्गानें जावयाचें आहे तो आमचा वारसा आहे आम्हांला आहे त्या स्थितींत समाधान मानून राहवयाचें नाहीं. आम्हांला अधिकाधिक चांगलें व अधिकाधिक सद्गुणी बनावयाचें आहे. आम्हांला केवळ माणूसच नव्हे तर योगीराज बनावयाचें आहे. अशी बाळगली पाहिजे महत्वाकांक्षा प्रत्येकानें !

योगीराजाचें पद कसें प्राप्त होतें याचें मार्गदर्शन श्रीसाईबाबांनीं त्याचप्रमाणें त्या मार्गानें गेलेल्या साधुसंतांनीं केलेलें आहे. येथें साईबाबाप्रमाणें आम्हांला समर्थ रामदासस्वामींचें स्मरण होतें. ते एका ठिकाणीं काय म्हणतात पहा !

‘ नसे गर्व आंगीं सदा वीत्तरागी
क्षमा शांति योगी दयादक्ष योगी
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा
इही लक्षणीं जाणिजे योगिराणा

अहंकाराप्रमाणें राग हाहि आमच्या वारशाला पुजलेला आहे. एवढ्याशा कारणावरून आम्ही रागाला वश होतों. त्या आवेशांत वाटेल त्याला वाटेल तें बोलतों व जें करूं नये तें करतों ! आणि मग मागावून पस्तावतों. गोष्ट घडून गेलेली असते. तिची दुरुस्ती होणें कठीण असतें. यासाठीं रागावर ताबा ठेवण्यासाठीं सतत झटणें, रागाचा गुलाम न होणें हें प्रत्येकाचें कर्तव्यच नव्हे तर तो प्रत्येकाचा धर्म आहे. या पवित्र धर्माचें पालन आपल्याकडून होत आहे का ? याचा विचार आपण चौकस दृष्टीनें केला पाहिजे.

तुमच्या मनाला शांति मिळावी, मन दुःखीकष्टी राहूं नये, असे नाहीं वाटत तुम्हांला ? मग रागावून संतापून व चिडून वागण्याचा मार्ग तुम्हीं स्वीकारला तर शांततेचा लाभ तुम्हांला कोठून होणार ? जो मीतभाषी, मीतरोगी नव्हे विरागी, तोच शांततेचा धनी होऊं शकतो. इतरांच्या वाऱ्याला ती उभी रहात नाहीं.

आपण नेहमी क्षमाशील राहण्याचा व वागण्याचा प्रामाणिकपणें प्रयत्न चालविला पाहिजे. एखाद्याकडून जाणतेपणीं लहानमोठे अपराध घडत असतात. अपराध करणें, चुका करीत रहाणें हा मनुष्य स्वभाव आहे. त्याला कारणेंही अनेक असतात.

# धर्माचरणाचें महत्त्व

***********************

'सत्यंवद' याच्याच पुढें 'धर्मं चर' म्हणजे धर्माचें आचरण कर, ही आज्ञा शास्त्रांत गुरुनें शिष्यास सांगितली आहे. प्रपंचामध्यें मनुष्याच्या मनोवृत्तीस मोह पाडून ननाप्रकारच्या अपायकारक मार्गांकडे आकर्षून नेणाऱ्या वासना वेळोवेळी उपस्थित होतात. जर मनुष्यें सर्वथा त्यांच्या आधीन होऊन वर्ततील तर पदोपदी त्यांचें अकल्याणच होईल. तें न व्हावें एतदर्थ परम कृपाळू जगत्पिता जो परमेश्वर त्यानें प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत सदसद्विवेकाचें बीज ठेवलें आहे. ज्ञानानें व अनुभवानें त्या बीजाचें पोषक होऊन, त्यास अंकुर फुटून विवेकरुपी वृक्ष होतो; व तो सत्संगतीनें प्रफुल्लीत होऊन सदाचरणरूपी उत्तम फलपुष्पांनीं सुशोभित होतो. जसें जसें ज्ञान वाढत जातें, तसतसा त्या ज्ञानाच्या विषयांपैकी चांगलें कोणते, वाईट कोणते, कल्याणकारक कोणते व अकल्याणकारक कोणते, याविषयीं विवेक उत्पन्न होतो; व जसजसा या विषयांपासून घडून येणाऱ्या कल्याणकारक किंवा अकल्याणकारक परिणामांचा अनुभव येत जातो, तसतसा हा विवेक विशेष विकास पावतो. मग निश्चय करून जें कल्याणकारक तेंच करावयाचें, व जें अकल्याणकारक तें वर्जावयाचें अशा प्रकारें मनुष्यांकडून वर्तन होऊं लागलें म्हणजे तो विवेक सदृढ होतो. जसे व्यायामानें शरीराचे अवयव सुदृढ होतात. व तदभावी ते निर्बळ होतात. त्याप्रमाणेंच मानसिक शक्तीची गोष्ट आहे. म्हणून प्रत्येक कार्यामध्यें विवेकाचा उपयोग करुन मनुष्यानें वर्तन केलें, म्हणजे तो बिवेक गुण वाढत जातो. जर त्याकडे दुर्लक्ष केलें तर तो दुर्बल होत जातो परंतु

---

परंतु सहनशीलतेचा फायदा घेऊन आपण एखाद्यावर रागवावें व स्वतःचें पतन करून घ्यावें कां ? त्यापेक्षां समजुतीचें, क्षमाशीलतेचें धोरण स्वीकारून सामोपचारानें एखाद्याला संभाळून घेणें हा दैवी गुण तुम्हांला शोभा देणारा आहे असें नाहीं का वाटत ? दया, क्षमा शांती ! तेथें देवाची वसती ' असें म्हटलें आहे ते उगाच नाहीं.

दया आणि क्षमा या जणूं काय आवळ्या जावळ्या भगिनीच आहेत, ज्यांना त्या पावल्या त्यांचें जीवन पावन झालें म्हणून समजावें.

आज बाबांचें पुण्यस्मरण करून आपण अनन्यभावानें त्यांची करुणा भाकूं या कीं, हे प्रभो, हे जे दैवी गुण आहेत, त्या गुणांपासून तूं मला वंचित करुं नकोस. तुझ्याप्रमाणें त्या सद्‌गुणांचा सहवास मला अखंड लाभूं दे. त्या सद्‌गुणांचा सुगंध अनुभवीत असतां तुझ्या नामस्मरणानें माझें जीवन पुण्यपावन होऊन राहूं दे.

—संपादक

तदनुसारें बहुप्रयत्नानें वर्तन केलें असतां तो आपला अत्यंत साह्यकारी व सुखदाता असा मित्रच होतो. जसा खरा मित्र आपल्यास अंतःकरणपूर्वक साह्य करितो, व सुख देतो, त्याप्रमाणेंच विवेकरुपी मित्र आपल्यास कल्याणाच्या मार्गानें वर्तण्याचे कामांत साह्य करितो. इतकेंच नाहीं तर त्याचें साह्य घेऊन तदनुसारें चालणें हें सुखकारकही वाटतें. त्याप्रमाणें ज्यांच्या अतःकरणांत विवेक सुदृढ असून नित्य जागृत राहातो, त्या मनुष्यांचें जें वर्तन तेंच धर्माचे रुप होय. म्हटलें आहे :—

“ सतांहि संदेहपदेषु वस्तुषु
प्रमाणमंत; करणपवृत्तयः ”

“ जे सुजन आहेत त्यांस आपल्या जागृतविवेकयुक्त अतःकरणाची प्रवृत्ति हीच एकाद्या कृत्याच्या धर्मत्वाविषयीं किंवा अधर्मत्वाविषयीं निर्णायक होते.” असे जे पुरुष ते शिष्ट ; त्यांचा जो आचार तो शिष्टाचार ; आणि धर्मशास्त्रकर्त्यांनीं शिष्टाचार हा धर्मत्वेंकरुन जो ग्रहण केला आहे तो याच दृष्टीनें. अतएव सामान्यतः आपल्यास जेव्हां एखाद्या कार्याच्या धर्माधर्मत्वाविषयीं शंका उत्पन्न होईल, त्यावेळी जे कोणी आपल्या आसपास विचारवान् व धर्मपरायण, सौम्यवृत्ति, अस्वार्थबुद्धि असे मनुष्य असतील, त्यांपाशीं जाऊन निर्णय विचारावा; म्हणजेच ते आपल्या विवेकशक्तीच्या बळानें आपल्यास धर्म म्हणजे कल्याणकारक मार्ग कोणता हें सांगतील. असे जे पुरुष तेच महात्मे होत; धर्माविषयीं जो निर्णय करावयाचा तो अशांचेंच वर्तन पाहून केला पाहिजे. प्रत्येक मनुष्य केवळ आपल्या अशिक्षित तर्कानें हा निर्णय करुं शकत नाही. ईश्वरप्रणीत म्हणून ज्या श्रुति म्हणजे हा निर्णय धर्मग्रंथ मानिले आहेत. त्यामध्येंहि कित्येक गोष्टींच्या संबंधानें परस्परविरोध दिसतो. ऋषिप्रणीत धर्मशास्त्रामध्येंही याच प्रमाणें मतभेद आढळतो. तेव्हां धर्माविषयीं निर्णय कसा करावा ? अर्थात जे धर्म-परायण महात्मे पुरुष त्यांच्या अंतःकरणाची प्रवृत्ति व वर्तन यांच्या अनुरोधानेंच निर्णय केला पाहिजे. यक्षानें धर्म राजास जे प्रश्न केले आहेत, त्यांमध्यें ‘ कः पंथाः ’ म्हणजे योग्य मार्ग कोणता, अथवा धर्म कोणता, हा प्रश्न केला आहे. त्यावर हें पुढील उत्तर दिले आहे; —

“ तर्कोऽ प्रतिष्ठः श्रुतयो विभिन्ना
नैको ऋषिर्यस्य मतं प्रमाणम् ।
धर्मस्य तत्वं निहितं गुहायां
महाजनो येन गतः स पंथाः ”

“ तर्क हा निराधार आहे; श्रुतीही भिन्न भिन्न आहेत; व धर्म सांगणाऱ्या ऋषीमध्येंही असा कोणी नाहीं कीं ज्याचें मत सर्वांहून विशेष प्रमाणभूत मानावें. तस्मात् मनुष्याच्या बुद्धीचे ठायीं ईश्वरानें जें धर्मनिर्णायक विवेकरुपी तत्त्व बीजरुपानें ठेविलें आहे, तें ज्यांच्या बुद्धीमध्यें परिपूर्ण दशेस आलें आहे असे जे महात्मे पुरुष, ते ज्या मार्गानें

वर्ततात तोच धर्माचा मार्ग होय," असा शेवटी निर्णय करावा लागतो. आतां महात्मे कोणास म्हणावें. याविषयीं वर विवरण केलेंच आहे. अशा प्रकारचे महात्में पुरुष कोणत्याही एकाच कालीं किंवा एकाच राष्ट्रांत निष्पन्न होतात असें नाहीं; व त्यांच्या उक्ति व चरित्रें कोणत्याही भाषेंत आहेत, असेंही नाहीं. सर्व भाषांमध्यें अशा सत्पुरुषांचीं बोधपर वचनें आहेत त्या सर्वांच्या अनुभावास आलेली जीं धर्मतत्त्वें तीच मुख्य धर्म तत्त्वें होत. मनुष्यमात्राचें वर्तन प्रथम जें धर्माविषयीं थोडें बहुत प्रवृत्ति होते तें आपल्या स्वतांच्याच विवेकांकुरानें होतें. त्याच्या दृढीकरणार्थ भिन्न भिन्न देशांतील ज्ञानीं व विवेकी पुरुषांनीं आचार व विवेक या दोहीकडे लक्ष्य देऊन जें धर्माचें स्वरुप सांगितलें आहे. तें धर्मशास्त्र. मनुष्याच्या धर्माचरणाविषयीं दुसरें प्रमाण तेंच होय. त्यामध्येंही परस्पर विरोध आढळून मनुष्याच्यानें निर्णय न होई. तर तत्कालीन जे सुजन, महात्मे व धर्मपरायण म्हणून प्रसिद्ध असतील, ते विचार करुन जें स्वरुप सांगतील तें तिसरें प्रमाण होय. अशा प्रकारें तिन्ही प्रमाणाच्या कसोटीस उतरून जें श्रेयस्कर ठरेल तोच धर्म.

श्रीमद्भगवद्गीतेंत धर्म म्हणजे अवश्य कर्तव्य कर्म, याचें स्वरूप तीन प्रकारचें सांगितलें आहे. ते प्रकार यज्ञ, दान, व तप हे होत. इतर काम्य कर्में, म्हणजे कांहीं एक हेतु पुरःसर करावयाचीं कर्में, पाहिजेत तर करावीं किंवा न करावी. त्यांच्या आचरणाविषयीं मनुष्य स्वतंत्र आहे. परंतु पूर्वोक्त तीन प्रकारचा धर्म मनुष्यमात्रानें अवश्य आचरिला पाहिजे. यज्ञ म्हणजे देवाचे आराधन, दान म्हणजे परोपकार व तप म्हणजे आपलें शरीर व वाणी व मन हीं तिन्हीही निर्मळ व नम्र व शांत अशी ठेवणें, हे धर्माचे तीन प्रकार होत. आपल्या ज्ञानानुरूप आपल्यास जें दैवत उपास्य असें वाटेल, त्याचें स्मरण, मनन, ध्यान, शरणागति, आत्मनिवेदन, भजन इत्यादि आध्यात्मिक उपचारांनीं आराधन करणें हाच यज्ञ होय. आपल्या देशांत प्रथम सूर्य, अग्नि, वायु इत्यादि जीं बाह्य इंद्रिय गोचर तत्वें तींच दैवतें असें वाटून त्यांचें आराधन करण्याची जी क्रिया तिला यज्ञ हे नांव प्राप्त झालें. परंतु पुढें जसजसा आपल्या लोकांच्या बुद्धीचा विकास विशेष झाला, आणि ज्ञान पूर्ण दशेस येऊं लागलें, तसतसा हीं सूर्यादिक बाह्यतत्त्वें केवळ जडतत्त्वें होत, या सर्वांचा अंतर्यामी असा एकच देव होय, असा बोध मनुष्यास होऊं लागला; व या देवास परब्रह्म म्हणजे सर्वव्यापक महत्तत्व, परमात्मा म्हणजे सर्वव्यापक चित्तत्व, किंवा परमेश्वर म्हणजे सर्वांचे नियम करणारें तत्व, अशीं नांवे त्यांनीं दिलीं. असा जो देव तो अमूर्त असल्यामुळें त्याचा यज्ञ म्हणजे पूर्वोक्त जें स्मरणार्थ रूपानें आराधन सांगितलें तेंच होय. तेव्हां यज्ञ म्हणजे ईश्वराधन असेंच विचारांतीं म्हटलें पाहिजे. भगवद्गीतेमध्यें ज्ञानयज्ञाची व जपयज्ञाची जी प्रशंसा केली आहे ती याच दृष्टीनें केली आहे. असो; हा जो

ईश्वराराधनरूप यज्ञ तो आपल्यास नित्य अवश्यक केला पाहिजे. हें धर्मसंबंधीं आपलें प्रथम कर्तव्य होय. दुसरें धर्मसंबंधीं आपलें कर्तव्य मनुष्यमात्रांवर यथाशक्ति परोपकार करणें हें होय. यासच खरें दान म्हणावें. हा दानरूपी धर्मही आपल्यास नित्य केला पाहिजे. तिसरें धर्मसंबंधीं कर्तव्य यत्नेंकरून आपलें शरीर निर्मळ, आपली मुद्रा अंतःकरणांतील भावानुरूप सरळ, व आपले मस्तक जे आपल्यास पूज्य, मान्य, ज्यांचा सत्कार आपल्यास केला पाहिजे अशा सर्वांपुढें नम्र ठवणें, हें शरीरसंबधी कर्तव्य होय. तसेंच आपली वाणी सत्यनिष्ठ, हितकारी मधुर व धर्मग्रंथांच्या विवादाविषयीं तत्पर ठेवणें, हें वाणीसंबंधी आपलें अवश्य कर्तव्य होय. तसेच मन सर्व मलिनवासनविरहित, शांत, सौम्य, व विवेकयुक्त ठेवणें, हें मनाच्या संबंधानें आपलें अवश्य कर्तव्य होय. या त्रिविध कर्तव्याचेंच तप हें नांव होय. याप्रमाणें यज्ञदानतपोरूपी जो धर्म, तो आपल्यास नित्य अवश्य आचारिला पाहिजे. "धर्मान्न प्रमदित्यव्यम्" म्हणजे धर्माचरणाविषयी आळस किंवा दुर्लक्ष करितां कामास नये. कारण "धर्मात्पर नास्ति" धर्माहून दुसरें कांहीं श्रेष्ठ नाहीं. धर्मः भूतानां मधु" धर्म सर्व प्राणिमात्र कल्याणकारक आहे, व जे निष्ठेनें त्याचे आचरण करितात त्यांस सुखावहही होतो. आपला खरा आप्त एक धर्मच होय. म्हटले आहे एक एव सुहृद्धर्मोऽप्यनुयातियः । शरीरेण समं नाशं सवर्मन्वाद्धि गच्छति ॥" धर्महाच एक खरा सुहृद् होय, कारण मरणानंतरही तो आपल्याबरोबर येतो; इतर सर्व कांहीं शरीराबरोबर आपल्यास नाहींसें होतें. तसेंचः—

"धर्मएव हतो हन्ति धर्मो रक्षतिः ।
तस्मादर्मो न हंतव्यो मा नो धर्मो हतोऽवधीत् ॥

जर धर्माचा तिरस्कार आपण केला तर तो आपला नाश करितो; जर त्याचें आपण रक्षण केले तर तोही आपलें रक्षण करितो; म्हणून धर्मानें आपला नाश करूं नये यासाठीं आपणही त्याचा नाश करूं नये धर्मास अनुसरून आचरण नित्य ठेविलें पाहिजे. आपण पूर्ववय केवळ सुखोपभोगांत घालवून उत्तरवय धर्माचरणांत घालवूं, असें म्हणणें मूर्खपण होय. कारण

न धर्मकालः पुरुषस्य निश्चितो
न चापि मृत्युः पुरुषं प्रतीक्षते ।
सदैव धर्मस्य क्रिया तु शोभना"
यदा नरो मृत्युमुखेहि तिष्ठति ॥

मनुष्यानें धर्माचरण अमुक वयांत करावें, अथवा अमुक वेळेस करावें, किंवा तो तसें करूं शकेल, असा मुळींच नेम नाहीं. कारण मनुष्य नेहमीं काळाच्या मुखांत असल्याप्रमाणेंच आहे. आणि मृत्यु प्राप्त झाला असतां तो कधींही क्षणमात्र थांबावयाचा नाहीं. यास्तव मनुष्यानें नेहमीच धर्माचरणनिष्ठ असलें पाहिजे.

---

# ' अतिथि देवो भव '

" जो परस्थ पांथस्थ तुझ्या गृही येईल त्यास देवाप्रमाणें मानून त्याचा सत्कार कर " ही आज्ञा गुरुभक्तीविषयींची जी आज्ञा तिच्याच पुढें आहे. प्रसंगीं परस्परांचें साह्य करावें हा मनुष्यमात्राचा धर्म होय. पशुपक्षी देखील कोणी अन्य प्राणी प्रसंगवशात आपल्या घरट्यांत, किंवा बिळांत किंवा गुहेंत आला असतां त्याच्या उपयोगीं पडतात, याविषयींच्या गोष्टी क्वचित् ऐकण्यांत येतात. मग ज्ञानसंपन्न व विवेकसंपन्न मानवी प्राणी परस्परांच्या उपयोगीं पडले तर त्यांत आश्चर्य कोणतें ! प्रचंडवायू सुटला, अथवा पर्जन्याच्या धारा सुरू जाहल्या असतां किंवा निबिड अंधकार रात्रिकाळीं पडला असतां, पक्षी झाडाच्या ढोलींत किंवा दाट झाडींत कोठेंतरी आश्रयास जाऊन राहूं शकतात. कदाचित् आश्रय नच मिळाला तर त्यांची शरीररचना अशी असते कीं त्यांस थंडी, वारा इत्यादिकांपासून तादृश इजा होत नाहीं. परंतु मानवी प्राण्यांस कोठेंतरी घराचाच आश्रय पाहिजे. पशुपक्षी क्षुधेनें व्याकुळ जाहले असतां तृणादिकांचें भक्षण करून आपला निर्वाह करूं शकतात; परंतु मानवी प्राण्यांच्या क्षुधेची शांति सहसा अन्नावांचून होत नाहीं. म्हणून एकदां अनोळखी, परस्थ, पांथस्थ मार्गक्रमण करीत असतां, घरचा संपन्न असला तरी, जवळची शिधासामुग्री संपली तर त्यास एकाद्यावेळीं आपल्यासारख्याच कोणा गृहस्थाकडे आश्रयासाठीं जावें लागतें. क्षुधेची वेळ झाली असतां व तिचा परिहार करण्याकरितां, किंवा मार्गांत रात्र जाहली असतां कोणाच्या घरीं तरी मुक्काम करावा लागतो मग तो विपद्ग्रस्त असून ज्यास शिधा-सामुग्री जवळ बाळगण्याचें विशेष साधन नसतें, आणि कार्यवशात् प्रवास तर करावा लागतो, अशा मनुष्यास पराठिकाणीं आश्रयास जाण्याचा वारंवार प्रसंग येतो. त्यांतही जे कोणी कांहीं रोगानें पीडिलेले असून त्यांस प्रवास करणें भाग पडल्या-मुळें मार्गांत अशा संकटांत पडतात, त्यांस तर मोठी मजल करण्याचें अवसान नस-ल्यामुळें वारंवार ठिकठिकाणीं कोणा तरी गृहस्थाच्या घरीं क्षुधातृष्णाशांत्यर्थ व श्रांत जहालेल्या शरीरास विश्रांति देण्याकरितां जावें लागतें. अशा अनेक प्रकारच्या कार-णांनीं प्रसंगवशात् जो कोणी पांथस्थ आपल्या घरीं येईल त्यास सत्कारपूर्वक आनंदानें आश्रयास जागा देऊन, यथाशक्ति भोजनादि उपचारांनीं त्याची क्षुधा, तृषा व श्रम यांचा परिहार करणें, हा केवडा धर्म आहे बरें ! म्हटलें आहे:—

" अरावप्युचितं कार्यमातिथ्यं गृहमागते;
छेत्तुः पार्श्वगतां छाया नोपसंहरति द्रुमः "

म्हणजे आपल्या घरीं आपला शत्रु देखील प्रसंगवशात् आश्रयात

आला तर त्याचें यथायोग्य रीतीनें आतिथ्य करून, सत्कार करावा. वृक्ष आपल्यावर कुऱ्हाड घालणाऱ्यावरही छाया करितो. ती त्याजवरून काढून घेत नाहीं. हा सत्कार जो अतिथि ज्या अवस्थेंत असेल व त्यास ज्या गोष्टीची आवश्यकता असेल, तिकडे लक्ष देऊन यथायोग्य रीतीनें करावा.

"देयमार्तस्य शयनं परिश्रांतस्य चासनम् ।
तृषितस्य च पानीयं क्षुधितस्यच भोजनं."

जो शारीरिक व्याधीनें पीडित असेल तो आपल्या घरीं आला असतां प्रथम त्यास आंथरूण द्यावें; जो नुसता श्रमून आला असेल त्याला आधीं बसावयास द्यावें; ज्यास क्षुधा लागली असेल त्याला प्रथम उदक द्यावें; याप्रमाणें शारिरीक पीडेच्या निवारणार्थ ज्या ज्या अतिथीला ज्या ज्या काळीं जें जें अत्यंत आवश्यक असेल तें तें पुरवून त्याचें समाधान करावें' मग तो स्वजातीय असो अथवा अन्यजातीय असो, स्वधर्मी असो अथवा विधर्मी असो. यथाशक्ति त्यास पूर्वोक्त रितीनें साह्य करणें हें आपले मनुष्यमात्राचे अत्यंत श्रेयस्कर कर्तव्य होय.

आपला जीव जसा आपल्यास अत्यंत प्रिय, त्याचप्रमाणें इतरांसही त्यांचा जीव प्रिय असतो. सुखदुःखाचा अनुभव जसा आपल्यास तसा इतरांसही असतो हें जाणून विचारी मनुष्यानें अतिथि प्राप्त झाला असतां त्याचा सत्कार करावा. पांथस्थ मार्गक्रमण करीत असतां श्रमून मध्यान्हकाळीं एखाद्या गांवाच्या समीप आला म्हणजे त्यास किती आनंद होतो, व आपण एखाद्याच्या घरीं जाऊन विश्रांति घेऊन क्षुधातृषेचा परिहार करूं अशी केवढी आशा धरून तो आपल्या घरीं येतो बरें ? अशा स्थितीमध्यें जो आपल्या घरीं येतो त्याचा यत्नेंकरून आपल्या सत्कार केला पाहिजे. तो अतिथि, एवढ्याच कारणानें आपल्या सत्कारास पात्र होय मग तो कोणत्याही वर्णाचा किंवा जातीचा असो.

"चक्षुर्दद्यान्मनोदद्याद्वाचं दद्याच सूनृतां;
अनुव्रजेदुपासीत स यज्ञःपंचदक्षिणः"

अतिथीचा क्षुधा, तृषा व श्रम यांचा परिहार करावा हें तर आपलें कर्तव्यकर्म होय. परंतु त्याचा पूर्ण सत्कार करणें म्हणजे त्याजकडे आनंदित मुद्रेनें पाहावें, मनापासून त्याचा आदर करावा, मधुर वाणीनें त्यापाशीं भाषण करावें, आपला समागम त्यास सुखप्रद करावा, व तो आपला निरोप घेऊन जाऊं लागला असतां त्याच्या मागून चार पावलें जाऊन त्याची बोळवण करावी. हा अतिथियज्ञ होय; व पूर्वोक्त पांच प्रकारची त्याची सेवा ही त्या यज्ञाची पांच प्रकारची दक्षिणा होय. याप्रकारें अतिथीचा सत्कार करणें हें गृहस्थास अत्यंत श्रेयस्कर होय.

आतां अतिथि कोणास म्हणावें या गोष्टीविषयीं विचार केला पाहिजे. गांवांतल्या गांवांत आळसानें आपला काळ क्रमण करणारा, व चांगला सशक्त व सुदृढ असून आपल्या उदरनिर्वाहार्थ कांहींच यत्न न करितां दुपारच्या वेळीं

कोणत्या तरी घरीं भोजनाच्या इच्छेनें जाणारा, तो खरा अतिथि नव्हे. किंवा परस्थ असूनही चांगला सशक्त व सुदृढ असतां आपल्या निर्वाहार्थ कांहीं उद्योगधंदा न करितां गांवोगांव फिरून आपली उपजीविका करणारा, तोही खरा अतिथि नव्हे. किंवा एकाद्या गृहस्थाच्या घरीं आल्यागेल्याचा सत्कार चांगला होतो म्हणून बुद्धिपुरःसर कधीं कधीं त्याच्या घरीं केवळ अन्नार्थी जाणारा, तोही खरा अतिथि नव्हे. खरा अतिथि तोच होय, कीं जो प्रसंगवशात् परस्थ व पांथस्थ असून केवळ नाइलाजामुळें प्रवासांत अकस्मात एकाद्याच्या घरीं आश्रयास जातो.

वर जीं अतिथिसत्काराविषयींचीं वचनें सांगितलीं आहेत तीं अशा प्रकारच्याच अतिथीविषयीं होत. असा अतिथि मार्गामध्यें श्रांत होऊन अनोळखी ठिकाणीं आला असतां त्यास संतोषानें जो भोजनादिक समर्पण करितो,त्यासच खरी पुण्यप्राप्ति होते. ही आतिथिभक्ति थोडी बहुत सर्व देशांमध्यें प्राचीनकाळापासून चालू आहे,परंतु या देशामध्यें आपल्या आतिथ्थ्याविषयीं लोकांच्या मनामध्यें जितकी निष्ठा आहे तितकी अन्यत्र कोठें असल्याचें ऐकिवांत नाहीं. ज्यांनीं प्रवासाचा अनुभव थोडासा घेतला आहे, त्यांस आपल्या देशांत जेथें आदरानें आतिथ्य सत्कार होतो अशीं थोडकीं स्थळें आढळलीं असतील असें नाहीं.अशा स्थळीं घरांत कशीही अडचण असली,व एकाच वेळीं अतिथी कितीही आले, तरी त्यांचा कंटाळा न करितां यजमान त्यांचा यथाशक्ति सत्कार केल्यावाचून त्यांस जाऊं देत नाहीं. आजकाल अदृश्य होत चाललेल्या पिढीच्या अंगीं हा मोठा स्तुत्य गुण आपल्या पहाण्यांत आलेला आहे. अलीकडे मात्र मनुष्यमात्रानें आपापल्या निर्वाहाची तजवीज करावी, व दुसऱ्यावर अवलंबून राहूं नये, ही जी अगदी आवश्यक समजूत होत चालली आहे, त्या समजुतीच्या ओघांत हा अतिथिभक्तिरूप पूर्वोक्त गुण प्रायः एकप्रकारें नष्ट होत चालला आहे, ही मोठी खेदकारक गोष्ट होय. अतएव ज्यांस आपल्या देशांतील प्राचीन प्रशस्त रूढी व आपल्या लोकांमधील प्राचीन काळापासून परंपरागत चालत आलेले सद्गुण यांचें संरक्षण व्हावें असें वाटत असेल, त्यांनीं प्रयत्नेंकरून " अतिथिदेवो भव " ह्या शास्त्राज्ञेचें यथाशक्ति परिपालन करून, आपल्या देशांत विशेष प्रचारांत असलेला आतिथ्यरूप जो धर्म त्याचा सहसा लोप होऊं देऊं नये.

" न कंच न वसतौ प्रत्याचक्षीत तद्व्रतम् " आपल्या घरीं आश्रयास कोणी आला असतां त्यास परत लावूं नये, हें गृहस्थाचें व्रत होय.



# स्थितप्रज्ञ कोणास म्हणावें ?

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ १ ॥

हा श्लोक जरी संस्कृत आहे तरी त्याचा अर्थ सुलभ आहे, तो असा:— "मुनि जे आहेत ते लोकांची ज्याविषयीं जागृति असते त्याविषयीं निद्रित असतात; व लोक ज्याविषयीं निद्रित असतात त्याविषयीं ते जागृत असतात."

साधारण भाषेंतील 'प्रज्ञाप्रतिष्ठित' ह्या शब्दाच्या अर्थाशीं हा अर्थ जुळतो. जो प्रज्ञ आहे, तो स्थिर असतो. ज्या गोष्टींविषयीं लोक निजलेले असतात त्यांविषयीं तो जागृत असतो. व ज्याविषयीं लोक जागृत असतात त्यांविषयीं तो निजलेला असतो. आतां हें असें काय चमत्कारिक लक्षण आहे, असें कोणास वाटण्याचा संभव आहे, पण, ह्यांतील अगदीं साधा अर्थ घ्यावयाचा नाहीं. तसा अर्थ चोरास, दुर्व्यसन्यास लागू पडतो. ज्या वेळीं रात्र असते त्या त्या वेळीं चोर व दुर्व्यसनी नेहमीं जागत असतात. पण सर्व लोक अगदीं गाढ झोपेंत असतात. म्हणून हा अर्थ घ्यावयाचा नाहीं. वास्तविक पाहिलें तर वरील सर्व अर्थ हा मुनीचें, थोरांचें, सत्पुरुषाचें लक्षण आहे. जो मुनी आहे. श्रेष्ठ आहे त्याला लोकांची जागृति निशेसमान वाटते व ज्यांविषयीं लोक निद्रित असतात त्यांविषयीं तो जागृत असतो. लोकांच्या नशेंत जागृति वाटणें हा अधिकार प्रज्ञाप्रतिष्ठास असतो. कारण ज्या गोष्टीविषयीं लोकांत उदासीनता असते त्या गोष्टींविषयीं हा काळजी वहात असतो. तसेंच ज्यांविषयीं लोक पर्वा करीत नाहींत त्याविषयीं हा चिंतातुर असतो. परंतु प्रापंचिक जन ज्या गोष्टींविषयीं रात्रंदिवस चिंता करीतात त्याविषयीं हा निद्रित असतो. म्हणूनच तो मुनी व श्रेष्ठ. मुनीचें किंवा प्रज्ञाप्रतिष्ठाचें आणखी एक लक्षण सांगितलें आहे व तें असें—

**आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत् ।**
**तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे स शांतिमाप्नोति न कामकामी ॥**

ह्या श्लोकांत ज्याच्याठायीं सर्व कामनांचा प्रवेश होत आहे, पण, ज्याच्याठायीं त्यांच्या भोगांची इच्छा नाहीं त्याला शांति प्राप्त होते असें म्हटलें आहे. अशांची फललाभाविषयीं उदासीनता असते.

प्रज्ञाप्रतिष्ठिताविषयीं कल्पना आपणांस आपल्या रोजच्या व्यवहारावरूनही होण्यासारखी आहे. एखाद्या मोठ्या कुटुंबांत कर्ता स्त्री किंवा पुरुष असतो. तिची

किंवा त्याची स्थिति काय असते! घरांत पुष्कळशीं मुलें असली व तीं खेळत असलीं, म्हणजे ती ह्या कर्त्या स्त्रीची झोंपेची किंवा विश्रांतीची वेळ. पण मुलें निजलीं म्हणजे ही जागी असावयाची. हा आपला नेहमींचा अनुभव आहे. त्याच-प्रमाणें कर्त्या पुरुषाची गोष्ट. घरांत कोणी मनुष्य दुखणाईत असला, म्हणजे ह्याला झोंप नसावयाची. कुटुंब फार मोठें असलें म्हणजे त्यांतील सर्व माणसांस ज्या-विषयीं मुलींसुद्धां चिंता नसते. त्याविषयीं हा चिंतातुर असतो. ज्याविषयीं त्यांच्याठायीं उदासीनता नसते त्याविषयीं हा इकडे उदासीन असतो. असाच प्रकार विश्वाचें जें हें मोठें कुटुंब त्यांतहि आहे. जे स्थितप्रज्ञ आहेत त्यांस सगळ्या जगाची काळजी, चिंता असते. साधारण लोक त्यांस, तुम्हीं जगाच्या भाकऱ्या कशांस भाजतां, लोकांच्या उठाठेवी तुम्हांस कशास पाहिजेत, असें म्हणत असतात. पण वास्तविक पाहिलें तर ह्या रिकाम्या भाकरी भाजणें किंवा उठाठेवी करणें नव्हे. त्यांचें हें कर्तव्य असतें. आणि तें ते करीत असतात. तुमचा आमचा प्रकार मात्र अगदीं निराळा. साधारण लोकांचें जें म्हणणें तें एका अर्थी आम्हांस बरेंच लागूं पडतें. कारण आमचें सर्व लक्ष प्रयत्नाच्या फलकाकडे असतें. आमच्या मनांत दुसरें कांहीं नसतें. म्हणून आमची जगाच्या कल्याणाची इच्छासुद्धां व्यर्थ. आपल्याला विनाकरण शीण मात्र होत असतो. स्थितप्रज्ञाचा कर्तव्याबद्दल निश्चय पूर्वीच झालेला असतो. व जो स्थिर आहे, प्रज्ञा प्रतिष्ठित आहे, भक्त आहे, तो प्रयत्नांच्या फलाकडे कधींच पाहात नाहीं. त्याचें लक्ष एकसारखें आपल्या कर्तव्याकडे असतें. त्यासदेखील अनुकूलता मिळाली, तर तीं हवी असते. पण तिच्यासाठीं खोळंबून रहात नाहीं. अत्यंत त्रास, अडचणी वगैरे सर्व सोसून तो आपलें काम चालवीत असतो. सर्व देशांतील श्रेष्ठांत व कनि-ष्ठांत दुसरे फरक असतील; पण, सर्वांत मोठा हा कीं, ज्याविषयीं इतर ! लोक जाग्रत असतात त्याविषयीं हे उदासीन असावयाचे व ज्याविषयीं लोकांची गाढ झोंप त्यां-विषयीं ह्यांची जागृति. म्हणजे ज्याविषयीं लोक निद्रित नसतात, त्याकडे हे लक्ष न पुरवितां यांचें लक्ष दुसऱ्याच विशेष गंभीर गोष्टींकडे असतें. हाच भाव पारमार्थिक स्थितींत आहे. कुटुंबाच्या स्थितीचा अनुभव हा अगदीं लहान अनुभव. पण हीच स्थिति कुटुंबाप्रमाणें राष्ट्राची काळजी वाहणारांची. प्रत्येक कुटुंबाप्रमाणें राष्ट्राची काळजी वाहणारांची योग्यता लोकांना जास्त वाटत असते. हे समाजासंबंधानें धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या बाबतींत कां खटपट करीत असतात? होत आहे, चाललेले आहे, उगाच फिरवाफिरव करण्याची आवश्यकता ती काय! आपण धर्मांत वाढत आलों आहों, व वाढत चाललों आहों असें समजुन स्वस्थ असावें असें साधा-रण लोकांस वाटत असतें. ह्यांत कांहीं नवल नाहीं. त्यांचें सर्व लक्ष सांसारिक गोष्टीं-कडे असतें. धर्मसुधारणा अगर सामाजिक प्रगति यांकडे कधीं पाहावयाची सुद्धां त्यांस इच्छा नाहीं. धर्ममार्गाविषयीं यांची अत्यंत निद्रावस्था असते.

जे लोक धर्ममार्गीकडील असें आपणास म्हणवीत आहेत त्यांचें लक्ष बाहेरील परिस्थितीकडे फार. केवळ श्रद्धावान भावानें सर्व साधत नसतें. साधतें असें म्हणणें ही एक निद्राच होय. श्रीकृष्णानेंदेखील ही निद्रा सांगितली आहे. देवळांत जा, मशिदींत जा, मंदिरांत जा. सर्वत्र असाच प्रकार आहे. ज्याविषयीं जागृति असावयास पाहिजे त्याविषयीं ती नाहीं. सर्व प्रकार नेहमी वरवर चालायचे. उत्सव करावयाचा म्हणजे प्रथम दिव्यांकडे, मंदिर सुशोभित किती झालें आहे तें पाहण्याकडे लक्ष. बाहेरचा हा सुशोभितपणा पाहिजे. नाहीं असें नाहीं. पण त्यापेक्षां अंतर्यामी जास्त निर्मलता पाहिजे. जसा बाहेर उत्सव तसा आंत उत्सव पाहिजे, बाहेर उत्सव आहे, पण आंत कांहीं नाहीं, अशी स्थिति असणें हा अत्यंत शोचनीय प्रकार. श्रद्धा कोणत्याही धर्माविषयीं असेना का, पण ती खरी श्रद्धा पाहिजे. तुकारामबावांनीं म्हटल्याप्रमाणें भक्तिसुखाचा अनुभव आला पाहिजे. त्यांची अशी स्थिति असे. पण, आमची मात्र तशी नाहीं. आमची स्थिति फार वाईट आहे. ते सतत त्या मार्गास अनुरूप उद्योग करीत असत. आमचा प्रकार मात्र उलट आहे. आम्ही शांत आहों असें लोकांस सांगतों मात्र. पण, आमची स्थिति निराळी. असे कित्येक लोक आहेत कीं ते परलोक नाहीं, असें मानतात. जें कांहीं आहे तें येथें असें मानणारे व आपण सर्व पंचतत्त्वांस जाऊन मिळणारे असें प्रतिपादणारे लोक आहेत. पण, त्यांतील आपण नाहीं, आपली श्रद्धा निराळी आहे. पुढें कांहीं स्थिति आहे, अशी आपली श्रद्धा आहे. आपलें वर्तन मात्र ह्या श्रद्धेच्या अगदीं उलट असतें प्रत्येक क्रियेंत, वचनांत, दुसऱ्या असंख्य गोष्टींत ह्या गोष्टींचा विचार असावा तसा नाहीं, हा प्रत्येकाचा अनुभव आहे. म्हणून ही आमची निद्रा होय. पण स्थितप्रज्ञ जें आहेत त्यांची स्थिति अशी नसते. जो स्थितप्रज्ञ आहे, त्याला ह्या गोष्टीविषयीं अत्यंत चाड असते. तुकारामाला आपल्या देवाचें दर्शन व्हावयास विलंब कां होत आहे, असें वाटत होतें. आपणांस असें कधीं वाटतें काय? पंधरा, वीस, पंचवीस वर्षें झाली, ह्या मार्गाचें अवलंबन आपणांस केलें आहे, नेहमीं येथें येत आहों; परंतु यापासून प्रगति काय झाली? ज्याला तुकारामासारखी आपली स्थिति झाली असें विचार करून वाटत असेल व त्याप्रमाणें वस्तुस्थिति असेल, तर तो धन्य. पण, तुमचीआमची स्थिति निराळी आहे. आपण आपल्या खऱ्या कल्याणाविषयीं उदासीन आहों. खऱ्या कल्याणाचा प्रसंग आला म्हणजे आपण निद्रितावस्थेंत असतों. त्या वेळीं आपणास गाढ झोंप लागलेली असते. ज्या गोष्टींविषयीं आपण वास्तविक उदासीन असलें पाहिजे त्यांविषयीं आपण अति दक्ष असतों. सारांश, कुटुंबांत तसाच प्रकार आणि धर्मांतही तोच प्रकार.

मनुष्याची वस्ती जर अनंतकालपर्यंत ह्याच ठिकाणीं असती व त्याला पुढें कांहीं स्थिति नाहीं असा प्रकार असता, तर गोष्ट निराळी. पण, अनंतकाळ स्थिति

# असें आहे आंध्र महाभारत !

## तेलगू भाषेंतिल आद्य ग्रंथराज

आंध्र महाभारत एकंदर तीन श्रेष्ठ तेलगू कवींनीं भाषांतरीत केलें आहे. दोनशें पासून तीनशें वर्षें पर्यंत हें महान कार्य चालू होतें. त्यामुळें तीनशें वर्षांच्या काळांतील ऐतिहासिक झलक त्यांत आलेली आहे.

महाभारत हा आम्हां भारतीयांचा सर्वश्रेष्ठ ग्रंथ त्याला पंचम वेद म्हणतात तो उगाच नाहीं. महाभारत ग्रंथानें आम्हां हिंदवासीयांची जडण घडण घडविण्यांत फार महत्वाचा भाग घेतला आहे. भारतीय वाङमयांत या ग्रंथाचें स्थान अनन्य-साधारण व असामान्य आहे. सर्व जगांतील थोर ग्रंथांत या ग्रंथाचें स्थान फारच उच्च आहे. प्रत्येक प्रांतांतील भाषांतून त्यांची भाषांतरें झाली असून हजारो वर्षां-पासून हा ग्रंथ आमची करमणूक करीत आलेला आहे. या ग्रंथानें जशी आमची घडवणूक केली त्याचप्रमाणें यापासून आम्ही प्रेरणा व स्फूर्ति संपादन केली आहे.

एक हजार वर्षांपूर्वी आंध्र प्रांताच्या तेलगू भाषेंतील सुरूवात महाभारताच्या भाषांतरानें झाली.

चालुक्य वंशांतील सुप्रसिद्ध राजा राजराजनरेंद्र यांचा तो काळ होता. तो राजा भोज राजाचा समकालीन होता. विद्वान व विद्वानांचा चहाता होता. महाराष्ट्रा-प्रमाणें या प्रांतांतही सुंदर मूर्ति, अप्पास्वामी, सर्वेंदर वगैरे अनेक भक्त कवि होऊन गेले. त्यानीं भक्तिगीतें रचिलीं गायिलीं व सारी जनता डोलायला लाविली.

---

आहे ही आपली श्रद्धा आहे. प्रत्येकाला हें असें वाटत असतें. सर्व धर्मांत अशा तऱ्हेचा उपदेश होत आहे. मात्र उपदेश फलप्रद व्हावा तसा होत नाहीं. आपला अनुभवही असाच आहे कीं उपदेश फलप्रद असा फार विरळा होतो.

जनतेंत धर्म प्रचार व्हावा, नीती धर्माचें महत्व जनतेला समजावें या हेतूनें राजनरेंद्राला महाभारताचें आपल्या प्रांताच्या तेलगू भाषेंत भाषांतर करण्याची जरूरी भासली. त्याच सुमारास कानडी भाषेंत पंप कवीनें महाभारताचें भाषांतर केलें होतें.

राजनरेंद्र हा विद्वानाचा आदर बाळगणारा व त्यांना मान सन्मानानें वागविणारा होता. त्याच्या पदरीं नन्नय या नांवाचे एक राजकवी होते. त्या काळांतील ते लोकप्रिय व माननीय कविराज होते. राजानें महाभारताचें तेलगू भाषेंत भाषांतर करण्याची कामगिरी या कवीराजावर सोपविली व त्यांनींही ती आनंदानें पत्करली.

महाभारताचें तेलगूंत काव्यमय भाषांतर करायचें म्हणजे ती का साधी गोष्ट आहे! नन्नय हे प्रगाढ संस्कृत पंडित होते. ते प्रतिभावान् होते. तेलगू भाषेवरही त्यांचें दांडगें प्रभुत्त्व त्यामुळें त्यानीं मोठ्या हौसेनें व उत्साहानें सुरू केलेलें महाभारताचें भाषांतर लालित्यपूर्ण झालें आहे. मूळ अर्थाला बाध न येऊं देतां त्यानीं कांहीं प्रसंग विशेष लालित्यानें व मोठ्या खुबीनें वर्णन केले आहेत.

महाभारत हा आम्हां हिंदवासीयांचा महान् ग्रंथ तर खराच, परंतु निरनिराळ्या प्रांतीय भाषांत त्या ग्रंथांची जी भाषांतरें प्रसिद्ध झालेली आहेत तीं अर्थात वेगवेगळ्या भाषापंडितांनीं केलेली आहेत. व्यक्ती तितक्या प्रकृति या न्यायानें प्रत्येकानें त्या ग्रंथराजमधील जो भाग स्वतःला विशेष आवडला त्या भागाचें विशेष तिखटमीठ लावून क्वचित स्वतःच्या कल्पनांचीही त्यांत भर घालून ग्रंथनिर्मिती केली आहे.

नन्नय या तेलगू महापंडितानेंही तोच मार्ग चोखाळला आहे. तें तेलगू महाभारत हा त्या भाषेंतील आदि महाग्रंथ समजला जातो. त्याचे रचनाकार एकटे नन्नय कवी हेच नाहींत. त्या महाकाव्याला तीन तेलगू पंडितांनीं यथाशक्ति हातभार लावलेला आहे. कवित्रय या नांवानें आंध्र प्रांतांत ते पूर्वीपासून प्रसिद्ध आहेत.

नन्नयनें आदि, सभा व अरण्य ( अर्धे ) या तीन पर्वांचें भाषांतर केलें तर त्यानंतर दोनशें वर्षांनीं तिक्कन्ना नामक कवीनें सर्व सर्गांचा पत्राचे तेलगू भाषेंत अनुवाद केला. अरण्य पर्वाचे जो अर्धा भाग शिल्लक राहिला होता त्याचें भाषांतर एरिप्रगडा नामक पंडितानें केलें

अशारितीनें तीन पंडितांनीं हें महाकाव्य त्या भाषेंत पूर्णत्वास आणिलें आहे. त्यामुळें स्वाभाविकपणें तीन शतकांच्या तेलगू भाषेच्या कालखंडाचें त्यांत प्रतिबिंब उमटलें आहे. तसेंच तत्कालीन समाजाच्या जीवनाचेही पडसाद त्यांत उमटले आहेत.

उत्तर भारतांत रामायण या ग्रंथाचें महत्त्व भारी आहे. त्याच प्रकारचें महत्त्व आंध प्रांतांत महाभारत ग्रंथाला आहे.

आंध्र महाभारत हें मूळ संस्कृत महाभारताचें भाषांतर असलें तरी तें शब्दशः भाषांतर नाहीं. आंध्र महाभारतांत मूळ महाभारतांतील कित्येक सर्ग संक्षेपतः कथन करण्यांत आले आहेत तर कित्येक सर्ग फार विस्तृतपणें वर्णन करण्यांत आले आहेत. जेथें जेथें त्या त्या कवीला हृदयस्पर्शी भाग आढळला तेथें तेथें त्या कवीची काव्य प्रतिभा मोकाट सुटलेली आहे. त्यामुळें त्यांत विशेष माधुरी व लालित्य आलेलें आहे.

त्यामुळें नलोपाख्यान, शंकुतलोपाख्यान यांसारखीं कथानकें कविप्रतिभेमुळें फारच सुंदर रीतीनें रेखाटलीं गेलीं आहेत.

परंतु त्याचबरोबर एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, मूळ कथानकाला मात्र कोठेंही धक्का लावण्यांत आलेला नाहीं. कीं त्यांचा यत्किंचीतही विपर्यास करण्यांत आलेला नाहीं.

महाभारत वाचण्याचें फळ काय? याचें वर्णन करतांना नन्नय कवी म्हणतात, ज्याला भरपूर आयुष्य पाहिजे त्याला महाभारत श्रवणानें भरपूर आयुष्य प्राप्त होईल. ज्याला संपत्तीची इच्छा आहे त्याला परिपूर्ण संपत्ति लाभेल; त्याला धर्माची आवश्यकता किंवा आवड आहे त्याला धर्मप्राप्ति होईल; ज्यांना संपत्तीची अपेक्षा आहे त्यांना संपत्तीचा लाभ होईल. अशा रीतीनें मनकामना पूर्ण करणारा हा महाभारत ग्रंथ आहे.

त्या कवी वचनावर आंध्र प्रांतीयांची अतोनात श्रद्धा आहे. आणि त्याच श्रद्धेनें त्या ग्रंथाचें वाचन पठन व श्रवण घरोघर यच्चयावत् स्त्रीपुरुषांकडून मोठ्या भक्तिभावानें केलें जात असतें.



# श्री साईबाबा व चांदोरकरादि भक्त

( ले. द. शं. टिपणीस )

## लेखांक ३

## अज्ञान नाशांतील अडथळे व उपाय

पुरवां एका मासिकांत एक सुंदर वाक्य वाचलें. ' गाय चारा खाते तीं वासरासाठीं नसून स्वतांसाठीं खाते ' एका अशिक्षित व व्यसनी माणसाच्या तोंडून हें वाक्य आलेलें असलें तरी या लहानशा वाक्यांत आमचा सर्व अध्यात्म साठविलेला आहे. जगाच्या कर्तृत्वाची मख्खी त्यांत व्यक्त झाली आहे. गायच काय जगांतील यच्चावत प्राणी माणूस सुद्धां जें कांहीं करतो तें स्वतःसाठीं करतो. स्वतांच्या फायद्यासाठीं करतो. आपला स्वार्थ साधण्यासाठीं करतो. धक्का देणारें हें विधान आहे हें खरें असलें तरी तें खरें आहे हें सत्य आहे. स्वार्थाविना जगाला जीवन नाहीं. कोणाहि व्यक्तीचें व्यवहार तपासून पाहिले तर त्यांतील हरएक गोष्टीच्या मुळाशी त्या व्यक्तीचा स्वार्थ, स्वताचा फायदा करण्याचा हेतू असलेला दिसून येईल. स्वार्थास्वार्थांमध्यें चांगला स्वार्थ, वाईट स्वार्थ, भयंकर स्वार्थ वगैरे गुणक्रमांक आपण लावतों व त्या क्रमांकावरून स्वार्थ निःस्वार्थ असे भाग आपण करतों हें निराळे. आंब्यांचे चांगले वाईट कच्चे पिकलेले असे प्रकार केले व त्यांचा जगाला कमी जास्त उपयोग असला तरी सर्व आंबेच आहेत हें नाकरतां येत नाहीं. तद्वत कोणता कां होईना पण मुळाशीं स्वार्थ हा आहेच हें नाकबूल करतां येत नाहीं. जगाच्या धारणेच्या मुळाशीं स्वार्थ असल्यामुळें यच्चावत् जीवमात्राच्या जीवनांतून कोणत्या ना कोणत्या रुपाने तो खेळत असला तर त्यांत नवल वाटण्यासारखे वा धक्का बसण्यासारखे कांहीं नाहीं. अहंकारांतून स्वार्थ निर्माण होतो.

### अहंकाराचें प्राधान्य

अहंकार प्रत्येकांत 'मी' निर्माण करतो. त्या स्वतांतील 'मी'साठीं प्रत्येक व्यक्ति प्राणी धडपडत असतो. या मी मुळें त्यांची षष्टी व द्वितीया निर्माण होऊन माझें घर, माझा मान, माझी पत्नी, माझीं मुलें, माझे भाऊबंद, मला पाहिजे, मला वाटतें, मला समजतें वगैरे गोतावळा मी भोंवती गोळा होतो. परंतु एकटा मी कांहीं करूं शकत नाहीं. एकपात्री नाटक रंगू शकत नाहीं. व्यवहार पूर्ण होण्यास त्याच्या जोडीला कोणीतरी तूं पाहिजे. म्हणून हा मी इतरांच्या मीला तूं म्हणून त्यांना आपल्या

गोतावळ्या बाहेर काढतो व त्यांना आपल्या हृदयांत स्थान देत नाहीं. दोन पात्रें झाल्यावर जीवनाच्या नाटकास व्यवहारास सुरवात होते. यांतच तो ती वगैरे पात्रें येऊन मिळतात. सर्वनामें मिळालीं कीं नटसंच तयार झाला. परंतु केवळ पात्रें असून काम भागत नाहीं. नाटकाचा खेळ होऊं शकत नाहीं. योग्य विषय व साधने यांची अत्यंत जरूरी असते. त्या विना नटांना आपल्या भूमिका पूर्णपणें वठवतां येणार नाहींत यावरून मी तूं वगैरे पात्रांना आपले कार्य व्यवस्थीत करतां यावें म्हणून अहंकारापासून दोन समुदाय निर्माण झाले. त्यांतील एकांतून कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये निर्माण झालीं व दुसऱ्यांतून पंचतन्मात्रें निर्माण होऊन त्यांतून पंचमहाभूतें निर्माण झालीं. पंचमहाभूतांपासून पृथ्वी हवा पाणी वगैरे हा सर्व दृश्य पसारा ही बाह्यसृष्टी निर्माण झाली. बाह्य सृष्टी हा विषय व इंद्रियें हीं साधने मिळाल्याबरोबर अहंकार दिग्दर्शीत नाटक जगाच्या रंगभूमिवर येऊन मी तूं वगैरे पात्रांचें नाट्य नाच चालू झाले व जीवनाच्या खेळास रंग भरला.

अशा प्रकारें अहंकार हा नानारुपांनीं एकमेकांना एकमेकाशीं खेळावयास लावून हा ब्रह्मांडपसारा अव्याहत चालू ठेवतो. व्यवहारांतून अहंकार पूर्ण नाहींसा झाला तर सर्व व्यवहार थंडावतील, स्थिर होतील, मृतप्राय होतील; कारण अहंकार क्रियाशील आहे. क्रिया करायला लावणारा आहे व जीवन ही क्रिया आहे. जीवन्मुक्तांनाही जगांत कार्य करण्यासाठीं थोडासा मग त्याला चांगला, उदात्त, पवित्र कांहीही नांव द्या, अहंकार हा शिल्लक ठेवावाच लागतो.

## श्रीरामकृष्ण व विवेकानंद

एकदा श्रीरामकृष्णानीं स्वामी विवेकानंदाना निर्विकल्प समाधीचा अनुभव दिला. समाधी सुखाच्या अमृताची गोडी स्वामिनी चाखली व ती पुन्हां पुन्हां घ्यावी असें त्यांना वाटूं लागलें म्हणून त्यांनी पुन्हा समाप्ति सुखाचा आनंद आपणास द्यावा अशी विनंति आपल्या गुरुना केली. तेव्हां श्रीरामकृष्ण म्हणाले, "हा अनुमव तुला एकदाच. जगांत तुला अजून बरेच कार्य करावयाचे आहे म्हणून किंचित कां होईना पण तुझ्याठायी मीपणा राहिला पाहिजे व तसा तो मी ठेवला आहे. प्रयत्न केलास तरी त्या समाधीचा अनुभव तुला मिळणार नाहीं. पण ध्यानांत ठेव कीं जीवनाच्या शेवटीं शेवटीं अशी समाधि तुला आपोआप लागेल असें झालें म्हणजे समाज कीं जगांतील तुझें कार्य संपलें. निर्वाण जवळ आले." पुढें स्वामी विवेकानंदाना गुरुनी सांगितल्याप्रमाणें अनुभव आला. हीच गोष्ट साईबाबांनीं 'भक्तासाठीं मला भोगणें भाग आहे' 'तुमच्यासाठीं मी हा संसार मांडला आहे.' 'तुमचीच चोकणी मी रात्रंदिन करतो.' 'माया मलाही गांजते वगैरे वाक्यांतून व्यक्त केली आहे. मात्र या सर्वांच्या बुडाशी संतांच्या आसक्तीतील

अनासक्ती योग असतो म्हणून त्यांची स्थितप्रज्ञावस्था ढळत नाहीं. आतां कोणीही सांगू शकेल कीं अज्ञानी अशिक्षित जें म्हणाला तें सत्य आहे.

**पुरुष हा केवळ द्रष्टा**

'अहंकार' हा महत तत्वांतून ( विश्वबुद्धि ) निर्माण झाला. व महत् प्रकृतींतून निर्माण झालें. महत् हे प्रकृतीचे व्यक्तरुप होय. अद्वैताचे द्वैत झाले व पुरुष–प्रकृति ही जोडी निर्माण झाली. शिवशक्ति पुरुष प्रकृती। प्राणगती दीपदीप्ती। हीं शुद्ध ब्रह्मचैतन्य विकृती'। एकीं कल्पिती द्वैतता ॥ अ १–६७ असें श्री साईसच्चरित्र सांगतें. पुरुष हा अकर्ता केवळ द्रष्टा आहे. तर हा सर्व ब्रह्मांड पसारा प्रकृतीपासून निर्माण झाला आहे. तीच या जगाची आदिशक्ति, तीच माया भगवती तीच कामशक्ति. शब्द खटकत असेल तर जीवनशक्ति म्हणा. या शक्तिला बाबा 'अल्ला' म्हणत. अल्ला म्हणजे आई, आदीमाता, जगन्माता, जगाला खेळवणारी माया. अद्वैताचें जें द्वैत झालें त्याला, त्या दिव्य युगुलाला निरनिराळ्या धर्मांनीं व पंथांनीं निरनिराळीं नांवें दिली आहेत. वेदांतीं ब्रम्ह माया म्हणतात तर सांख्य पुरुष प्रकृती म्हणतात. शक्ति 'शिवशक्ति संबोधतात तर वैष्णव 'लक्ष्मी नारायण' राधाकृष्ण सीताराम अशी नांवें त्या युगुलास देतात. रोमन इरेबस–निक्स अशी जोडी लावतात तर मिश्र 'आईसिस–ओसिरिअस' मानतात–ईसाई 'आदम इंव्ह' असें म्हणतात आणि प्राणि विज्ञानांत 'युनी–सेल्लर ऑरगॅनिझम' म्हणतात. याच शक्तिला 'फ्राइड' या मनोविश्लेषण शास्त्रज्ञानें Scxula energyor brive असें नांव दिलें परन्तु त्या नांवामुळें त्या शक्तीची कल्पना येण्याऐवजीं भलतेच गैरसमज निर्माण होऊं लागले. त्यामुळें कांहीं शास्त्रज्ञांनी तिला ego energy किंवा love असें नांव दिले. कांहींही नांव द्या नांवाशीं आपणास विशेष कर्तव्य नसून त्या मूळ शक्तीचें कार्य उद्देश व पद्धत यांच्याशीं आहे. जग उत्पत्ती हें तिचें कार्य असून जें आहे तें नाहीं व जें नाहीं तें आहे असें भासविणें ही तिची रीत आहे. कोणत्या ना कोणत्या तरी रुपानें आपलें अमरत्व कायम ठेवण्याचा तिचा उद्देश असल्यामुळें हा सर्व सृष्टींचा गाडा सतत चालू राहिला आहे. आपल्या मूळ अव्यक्तांत विलीन होण्याची मीलनाची ओढ तिच्यांत आहे, हें मीलन साधून अमरत्व प्राप्त करून घेण्याची आस तिच्यांत आहे. यामुळें मानव हा कला, साहित्य, मुलेंबाळें, कीर्ति, पराक्रम वगैरे रुपानें आपलें चिरंजीवीत्व राखण्याचा प्रयत्न करतो.

**काम शक्तीचें अचाट सामर्थ्य**

अशा प्रकारें मुळचें द्वैत व त्यांतील शक्ति निरनिराळया नांवानें ओळखली जाते. यांपैकीं 'कामशक्ति' हा शब्द सोपा व त्या शक्तीची कल्पना आणून देणारा

आहे. कारण कोणत्याही जाणत्या व्यक्तीला त्या शक्तीच्या सामर्थ्याची, तिच्यांत असलेल्या खेचण्याच्या ताकदीची, तिच्यांतील ओजाची थोडीफार कल्पना अनुभवानें आलेली असते. माणसाला त्रस्त करण्याचें, 'त्राही भगवान' करून सोडण्याचें तिचें सामर्थ्य व्यक्तीला आपल्या आयुष्यांत केव्हां ना केव्हां तरी प्रत्ययास येत असते. कामशक्तीला आपण वाईट समजतों कारण आपण तिचा वाईट उपयोग करतो. त्या शक्तींत चांगलें व वाईट कांहींच नाहीं. वीज चांगली कीं वाईट ? जशी वापराल तशी. डॉक्टर ज्या विषानें रोगी बरें करतो त्याच विषानें माणसें मारतांही येतात. यांत विषाचा काय दोष ? वापरणारा दोषी. कामशक्तीचा योग्य उपयोग केल्यास नराचा नारायण होईल तर अपव्ययानें नराचा नरराक्षस होईल. ज्या मानवी व्यक्तीच्या ठायी कामशक्ती जोसांत असते, पण संयमानें तिचा उपयोग चांगल्या कामीं केला जातो. त्याच व्यक्ती मानवी रत्नें म्हणून प्रसिद्ध होतात. व त्यांच्याच हातून मानवी कल्याण होतें. तेच पराक्रम करतात. तेच नाट्य, शिल्प, नाना कला निर्माण करून मानवी जीवनाला आनंद देतात व तेच मोठे मोठे शोध लावून मानवी जीवनांत सुखसमृद्धि आणतात. जे या शक्तीला मोकाट सोडून इंद्रियद्वारा वाटेल तसा वाव देतात ते मानवाचे पशू होतात...वास्तव या शक्तीचा संयमानें संचय करून तिला चांगल्या कामीं लावण्यांतच व्यक्तीचें खरें हीत, खरी प्रगती व खरे सुख, कल्याण आहे. असें न केलें तर अध्यात्मज्ञान मिळविण्याच्या मार्गांतील ती एक धोंड होऊन बसेल. म्हणूनच आमच्या अध्यात्मांत ब्रह्मचर्याचें अति महत्व मानलें आहे. अध्यात्मिक कार्यासाठीं व जगाच्या कल्याणासाठीं या शक्तीचा उपयोग करून घ्यावयाचा असला तर संयमानें तिचा संचय करून ती योग्य कामीं वापरली पाहिजे. यासाठींच हिच्यांतूनच निर्माण झालेला 'अहंकार' कीं जो व्यक्तीस अयोग्य गोष्टीकडे खेंचीत असतो त्यालाही बगलेंत मारून चांगल्या गोष्टीकडे वळविला पाहिजे.

## इंद्रियें, बुद्धि व मन

इंद्रियें, बुद्धि व मन ही कामशक्तीची, अहंकाराची, साधनें आहेत. यांच्या द्वारा बाह्य जगाचा उपभोग घेतला जातो,

इंद्रिय बुद्धी आणि मन ।
ही त्या कामाचे आयतन ।
तयांच्या योगे जीवाचे ज्ञान ।
झांकूनि मोहन घाली तया ॥

कॅमेरामन काळ्या कापडाच्या पडद्याआड राहून त्याला पाहिजे तीं बाह्य दृश्यें भिंगाच्या साह्यानें आंत घेतो. तद्वत् अहंकार हा पडद्या-

आड राहून—कित्येक वेळा तो इतक्या कुशलतेनें लपून राहातो कीं आहे कीं नाही याचा सुगावा लागणें कठीण—मन—बुद्धयादी इंद्रियांच्या साह्यानें बाह्य सृष्टीतील विषयांचा उपयोग घेतो. मी मोठा असा अहंकार असलेल्या माणसाला तिसऱ्या एकाद्यानें अदबीनें नमस्कार केला कीं त्या माणसाला बरे वाटतें; म्हणजेच त्याचा अहंकार स्वताचे मोठेपण सिद्ध झाले, मान्य झालें म्हणून खूष होतो. हा बाह्य नमस्कार त्याच्यापर्यंत ( मी पर्यंत )पोहचाविण्याचें काम त्याच्या इंद्रियांनीं केलें. बाह्य जगांतील विषयांवर ' अहंकार पोसत असल्यामुळें इंद्रियांची तोंडें कॅमेराच्या तोंडाप्रमाणें तो सदैव बाह्य सृष्टीकडे ठेवीत असतो

**अंतर्मुख होण्याची जरुरी**

यामुळें इंद्रियें बाह्य जगाकडे धांवत असतात. त्यांची ही धाव रोखून त्यांना अंतर्मुख केले पाहिजे. यासाठीं यमनियमादि साधनांचा उपयोग


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठीं बलवान बनाः**—यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबेल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्डे, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रें, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहाः...



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोला, मुंबई ३

प्रोप्रायटर — डी. एच्. साखरकर

करावा लागतो. संयमाने त्यांची धाव रोखली की अहंकार हतबल होतो. कामशक्ति वा अहंकार यामुळें लोभ निर्माण होतो. या शक्तीला अडथळा झाला कीं डबक्यांतून डांस व्हावेत त्याप्रमाणें क्रोध, मद मत्सर वगैरे षडारिपू निर्मान होतात हे डांस जगांत फैलावून मानसाची अध्यात्मीक प्रकृती साफ बिघडवून टाकतात. या संबंधी श्री साईचरित्रकार म्हणतात.

काम गतीस जै अवरोध । तैच तो काम होई क्रोध ।
पदोपदी हा मोक्षास विरूद्ध । ज्ञान प्रतिबंधक ही वृत्ति ॥
कामक्रोध यांचा त्रास । जडलाच आहे या जीवास ।
ब्रह्मस्वरूपा जवळपास । ज्ञानाचे पंक्तीस वास यांचा ॥
तयांपुढे ज्ञानीही न टिकत । ज्ञानिया करिती पैजेने चित ।
महाप्रलय करण्याचें सामर्थ्य । न कळता ग्रासीत प्राणिया ॥

या सर्वांचें साधन इंद्रियें असल्यामुळें दृढनिश्चयानें त्याना कह्यांत ठेवल्यानें, त्यांचें दमन केल्याने, संयम राखल्याने कामक्तीचा संचय होऊन तिचें सामर्थ्य वाढते. नदीला धरणे बांधून पाण्याचा संचय करतात व मग तें पुन्हां पाहिजे त्या प्रमाणांत पाहिजे त्या ठिकाणीं खेळवतात व त्यामुळें त्या पाण्यावर जीवधारणेस लागणारे सुंदर धान्य ! भाजीपाला व फळफळावळ. निर्माण होते. तसेंच या शक्तीला संयमाची दमनाची धरणें बांधून तिचा संचय करून मग ती पुन्हां त्या प्रमाणांत बाह्य जगांतील वाङ्मय, शिल्प, चित्र, गायनादी कला व विज्ञान वगैरे मळयांतून खेळवल्यास मानवी मनाला थक्क करणाऱ्या व जीवनांत आनंद सात्विक सुख आणून अध्यात्मिक जीवनाचें पोषण करणाऱ्या गोष्टी निर्माण होतात. असें न केलें तर जीवनाचे 'पानशेत' होऊन अध्यात्मिक शक्तींची नासधूस व मोडतोड होईल. यामुळें दमन संयमाचें महत्व फार मानलें आहे. आत्मज्ञान होण्यास या गोष्टी आचरणांत आणणें जरूर आहे.

## ह वाटतें तेवढें सुलभ नाहीं

परंतु संयम काय किंवा 'दमन' काय, वाटतें तेवढें सोपें नाहीं. महा कठीण काम आहे तें. असली धरणें बांधण्यांत थोडासा जरी निष्काळजीपणा घडला, किंचित काना डोळा झाला तर केव्हां 'खडकवासला' होईल याचा नेम नाहीं. संयमादी साधनद्वारा इंद्रियाना अंतर्मुख करणें सर्वसाधारण संसारी व्यक्तीस फार–फारच–कठीण आहे. कारण इंद्रियांत मोह पाडणारें विषय या बाह्य जगांत इंद्रियासमोर सारखे नाचत असतात. मोहाला काटशह देऊन बाह्य विषयाच्याच आधारें इंद्रियें अंतर्मुख करण्याची साधना अध्यात्मामध्यें उपलब्ध आहे. ती म्हणजे सगुण भक्ति होय. श्री. हेमाडपंतांनीं भक्तिचें महत्त्व—

तरी व्हावया माया निरसन । उपाय एक भगवद्भजन ।
भगवद्भक्ता नाहीं पतन । भवबंधनही नाहीं तया ॥
जन म्हणती माया उटकी । परी ती आहे महाचेटकी ।
जातिया फंसवी घटकोघटकी । भक्त नाचविती चुटकीवरी ॥
जेथें ठकती ज्ञानसंपन्न । तेथें टिकती भाविकजन ।
कीं ते नित्य हरिचरणीं प्रसन्न । ज्ञानाभिमान घन ज्ञानी ॥
म्हणोनि व्हावया मायातरण । धरावे एक सद्गुरूचरण ।
रिघावें तया अनन्य शरण । भवभय हरण तात्काळ ॥

असें सांगितलें आहे.

## विषानें विष मारायचें

होमियोपाथिक औषध देण्याचें तत्व असें आहे की, ज्या औषधानें माणसास जे रोग होतात ते रोग तेच औषध पण सूक्ष्म अणू घटकांत आणून दिल्यानें बरे होतात. धतुरा या विषाच्या योगानें जे विकार होतील ते विकार ज्या व्यक्तीस झाले असतील त्या व्यक्तीस धतुरा हें विष अणू परमाणू घटकांत आणून सूक्ष्म प्रमाणांत दिल्यानें झालेले सर्व विकार बरे होतात. विषानें विष मारण्याचा हा प्रकार आहे. काट्यानें कांटा काढावा तसें हें आहे. याच तत्वाचा उपयोग करून सर्व साधारण जनतेसाठीं सगुण भक्ति म्हणून भक्तीचा एक प्रकार आमच्या ऋषिमुनींनी अध्यात्मांत रूढ केला आहे. जगत् मिथ्यः हें खरें असलें तरी या मिथ्यालाच सत्य समजून त्याचाच उपयोग करून त्याला उडवून देण्याच्या तत्त्वावर सगुण भक्ति आधारली आहे. मिथ्याला मिथ्यानेच शह द्यायचा, मायेला मायेनेच मारायची, भ्रमाला भ्रमानेच उडवायचें असा प्रकार सगुण भक्तींत असतो. जगाचें सत्यत्व हा भ्रम आहे हें खरें असलें तरी तो घालविण्यासाठीं ईश्वर सगुण आहे असा दुसरा भ्रम, कल्पना, वा भावना भक्तांत निर्माण करून त्यांत त्याला रंगवून त्या नादांतच हळुहळु त्याला निर्गुणाकडे नेण्याची अध्यात्मांतील सगुण भक्तीची पद्धत खरोखर अवर्णनीय आहे. या बाबींत आमच्या अध्यात्मानें जितका सूक्ष्म विचार केला आहे तितका इतरत्र आढळणार नाहीं. सगुण भक्ति म्हणजे अध्यात्मांतील भातुकलीच आहे. हा भावनेचा खेळ खरा. परंतु खेळाच्या नादांत मुली संसारासंबंधीं अनेक गोष्टी न कळत शिकत असतात. व सख्य, वात्सल्य वगैरे भाव वाढीस लागतात. तसेंच या भक्तीच्या भातुकलींत होते. भातुकली म्हणजे संसारशिक्षणांतील Play way method आहे. हें सर्व ब्रह्मांड व त्यांतील व्यापार म्हणजे मायेच्या संगतीनें ब्रह्मानें मांडलेला भातुकलीचाच खेळ आहे. नाहीं तर काय? प्राण्यांच्या उत्क्रांतीसाठीं ब्रह्मानें निर्मिलेली ही Playway method आहे. बोलून चालून खेळ!

मनांत आले मांडला. मनांत येईल तेव्हां मोडेल. हा नुसता खेळ आहे. त्यांत सत्य नाहीं. कोणताही खेळ सत्य नसतो. परंतु तो खेळ खेळून अनेक गोष्टी प्राणी शिकूं शकतो. या मोठ्या भातुकलीला शह देऊन सत्य शिकण्यासाठीं सगुणभक्तीच्या भातुकलीचा खेळ मांडला आहे. मुलांच्या शिक्षणांत Make—believe (नाट्य)चा उपयोग करतात. हें सर्व दृश्य जगत् Make—believe आहे. Maya has made us to believe it तेव्हां या मोठ्या Make-believe ला शह देण्यासाठीं दुसरें make believe सगुण भक्ति निर्माण झाली आहे. खेळ झाला तरी तो तन्मयतेनें व प्रामाणिकपणे खेळला तरच फायदेशीर होईल. तसेंच सगुण भक्तिची भातुकली तन्मयतेनें व प्रामाणिकपणें खेळली तरच ती फायदेशीर होईल. तिच्या साह्यानें कर्मीत कमी त्रासांत नकळत भक्त इंद्रियांवर विजय मिळवू शकतो व अध्यात्मांतील अनेक अडथळे दूर करूं शकतो.

**ब्रम्हदेवाची आखणी**

खेळ झाला तरी तो खेळण्यासाठीं व पूर्णत्वास नेण्यासाठीं जीवांची जरूरी असते म्हणून ब्रह्मानें आपल्या खेळांत नाना जीवांची उत्पत्ती करून त्यांना आपल्या खेळांत भाग घ्यावयास लावून आपला खेळ पूर्णत्वास जाईल म्हणजे जीवमात्रासह ही सर्व सृष्टी आपल्या मूळ रूपांत म्हणजे अव्यक्तांत विलीन होईल अशीही व्यवस्था करून ठेवली आहे. सगुण भक्तीच्या खेळांतही अशा प्रकारची सर्व व्यवस्था करून ठेवली तरच तोडीला तोड होऊन मायेनें माया घालविण्याचा, भ्रमानें भ्रम मारण्याचा हेतू साध्य होईल. सगुण भक्तीची भातुकली खेळण्यास भक्तांची जरूरी आहे. त्यांना या खेळांत भाग घेण्यास लावण्यासाठीं नाना युक्त्या उपयोगांत आणल्या आहेत. मानवी अहंकार हा असा आहे कीं तो ग्रॅमभर सुखासाठीं किलोभर काट्याकुट्यांतूनही जाण्यास तयार होतो. अहंकाराची ही हांव लक्षांत घेऊन सगुण भक्तींत अशा पुष्कळ गोष्टी ठेवल्या आहेत कीं ज्यायोगें अहंकाराची ताहान भागून भक्ताला सुख आनंद वाटेल व त्यायोगें त्याचें मन सगुण भक्तींत रंगून जाईल. मात्र अशा सुखाचा आनंदाचा काटा सात्वीकडे झुकता ठेवण्याची काळजी घेतली आहे. सगुण भक्तींत प्रथम प्रथम भक्ती करणाऱ्याला आपण अभक्तापेक्षां कांकणभर सरस आहोंत असें वाटून त्याचा अहंकार खुष होतो. आराध्य दैवत सुंदर ठेवण्यांत मोठमोठ्या पूजा करण्यांत, आरस करण्यांत करणाऱ्याला एक प्रकारचा मोठेपणा वाटतो. कारण त्याच्या अहंकारास स्तुतिनें गुदगुल्या करण्यास लोक तयार असतातच. पहाणाऱ्यांच्या दृष्टीला एकंदर सुंदरपणा पाहून आल्हाद वाटतो व मनाला एकप्रकारें सात्विक आनंद होतो. देवाला नाना खाद्यपदार्थ आवडतात या कल्पनेमुळें नैवेद्य व प्रसादाचें नाना प्रकार होत असतात. यामुळें जिभेला व

व पोटाला सुख मिळून माणसें खूष होतात, व अशा ठिकाणाला पुन्हां पुन्हां भेट द्यावी असें त्यांस वाटतें, कथा कीर्तन, गायन वादनादिमुळें मनाला आनंद वाटून तो पुनः पुनः मिळविण्यासाठीं माणसें एकत्र गोळा होतात.

**मानवांतील उत्सवप्रियता**

मानवांत असलेल्या उत्सव प्रियतेला सगुण भक्तींत पूर्ण वाव मिळूं शकतो. उत्सवामुळें चुकून कां होईना सत्संगतीचा लाभ मिळणें शक्य होते. अशा प्रकारें नानाविध गोष्टींमुळें नाना मानसिक ठेवणीची व विचाराचीं तऱ्हेतऱ्हेचीं माणसें सगुण भक्तींत एकत्र येऊं शकतात. घटकाभर कां होईना पण त्यांच्या डोक्यांत चांगले विचार वास करतात. जिव्हा न कळत देवाचें नाम घेतें व हात ताल धरतात मानव हा अनुकरणप्रिय प्राणी असल्यामुळें एकाचें पाहून दुसरा, दुसऱ्याचें पाहून तिसरा याप्रमाणें सगुण भक्तीचा पसारा आपोआप वाढत जातो. दुसऱ्याचें पाहून कां होईना किंवा स्वतःचा कांहीं फायदा होतो या स्वार्थी दृष्टीनें कां होईना एकादा कां या सगुण भक्तींत सामील झाला कीं त्याला गोडी लागून तो त्यांत रमून जातो कारण सगूण भक्तीचा एकंदर थाटच असा असतो कीं त्यामुळें मानवी मनाला, अंतःकरणाला व चित्ताला सुख व आनंद वाटतो.

**मानव संवयीचा दास**

दुसरी गोष्ट अशी कीं मानव हा संवयीचा दास आहे. जशी संवय तसं वळण तसा तो वागतो. पुन्हां असें कीं एकादी गोष्ट पुनः पुन्हां केल्यानें ती करण्याची संवय आपणास लागते तसेंच जें सुखावह आहे तें पुनः पुन्हां करण्यास माणूस धावतो श्री साईबाबांचे शिर्डीतील जीवन व कार्य सूक्ष्म रीतीनें पाहिल्यास असें दिसून येईल कीं बाबांनीं वर उल्लेखलेल्या सर्व युक्त्या प्रयुक्त्यांचा पुरेपुर उपयोग करून घेतला आहे. सुखाच्या लालसेनें सगुण भक्तीच्या सोहळ्यांत माणूस पुनः पुन्हां भाग घेतो व हळूहळू ती त्याची संवयच होऊन बसते. त्याची सर्वेंद्रियें व भावना सगुणाकडे धांव घेऊं लागतात. दृष्टीला देवाचें रुप आवडूं लागते व हळूहळू जगांतील इतर रुपांत सुंदरपणा वाटेनासा होतो. कान देवाचें नांव व स्तुति ऐकण्यास हपापतात. नाकाला धूप चंदन पुष्पांदिकांचा वास आवडू लागतो. हात देवाची सेवा करण्यास मूर्तीकडे वा सद्‌गुरुकडे नकळत धावूं लागतात. असें होण्यास भक्तानें काय करावें व तसें केल्यास काय होईल हें बाबांनी पुढीलप्रमाणें सांगितलें आहे —

मनबुद्धयादि इंद्रियगण । करूं आचरितां विषय सेवन ।
करावें आधीं माझें स्मरण । तैं मज समर्पण अल्पांशे ॥
इंद्रियें विषयावीण राहती । हें तों न घडे कल्पांतीं ।
ते विषय जरी गुरुपदीं अर्पिती । सहजी आसक्ति राहील ॥

कामतरी मद्विषयींच कामावें । कोप आल्या मजवरीच कोपावें ।
अभिमान दुराग्रह समर्पावे । भक्ती व्हावें मत्पदीं ॥
कामक्रोध अभिमान । वृत्तिंजव उठती कडकडून ।
मी एक लक्ष्य लक्षून । मजवरी निक्षून सोडाव्या ॥
क्रमेंक्रमें येणेंपरी । वृत्ति निकृंतन करील हरी ।
मग या विखार तयाच्या लहरी । तो परी हरील गोविंद ॥ अ.२४ ओ'४६ ते ५०

अशा प्रकारें भक्ति ही सर्व साधनांत शरीर व भावनांना सुखावह व सुलभ असें साधन आहे. 'भक्ति' ही हंसत खेळत ब्रम्हज्ञान मिळविण्याची युक्ति आहे.

## जगांत जिकडे तिकडे भेसळ

हंसण्या खेळण्याच्या नादांत एक महत्वाची गोष्ट दृष्टीआड होण्याचा संभव आहे. म्हणून तिचा विचार करून हा लेखांक पूर्ण करूं व पुढील लेखांकांतून संसारासंबंधीं बाबांचा काय उपदेश आहे त्याकडे लक्ष देऊं. सगुणभक्तीचा खेळ खेळला जातो तो मायेच्या आधारांत व मायेनेंच निर्माण केलेल्या साधनांनीं. मिश्रणाच्या खाद्यानें हा सर्व जगत पसारा मायेनें निर्माण केल्यामुळें जगांत जिकडे तिकडे भरपूर मिश्रण भेसळ आहे. ही भेसळ सृष्टींतील यच्चावत पदार्थ व प्राणि मात्रांत आहे. चांगल्याच्या ठिकाणीं वाईट व वाईटांत चांगले हें असणारच.हा अनुभव बाजारांत आपणास हरघडी येतच असतो. कोठेंही जा 'शुद्ध' चांगले असे मिळणे कठीण, धान्यांत खडे,दुधांत पाणी साखरेंत भुसा, कोळशांत दगड,घासलेटांत पाणी,पैशांत खोटे,नोटांत बनावट अशा प्रकारची भेसळ सर्व पदार्थ मात्रांत थोडी फार असणारच. सुंदर गुलाबाला काटे नसले तर मग मायेची महती काय राहिली ? मायेनें निर्माण केलेल्या मानवांतही चांगल्या वाईटाची भरपूर भेसळ असल्यामुळें त्याच्या सर्व व्यवहारांत त्याचेच प्रतिबिंब पडल्यास नवल नाहीं. यांतून अध्यात्म शास्त्राचीही सुटका झालेली नाहीं. त्यांतही भरपूर भेसळ आहे. अस्तलं नक्कल एकमेकांत मिसळून गेले आहेत. आत्मज्ञान होण्यास अस्सल नक्कल ओळखतां आले पाहिजेत हें तज्ञच करूं शकेल साधारण मानवाला हें शक्य नाहीं रत्न पारखायाला रत्न पारखीच पाहिजे.

## त्यासाठीं खरा रत्नपारखी पाहिजे

तुम्ही आम्ही काचेच्या मण्याला रत्न म्हणून जोपासून ठेवूं. सगुण भक्ती करतां करतां अशा एका स्थितींत भक्त येतो कीं त्या वेळीं अध्यात्मांतील गोष्टी घटकेंत खऱ्या तर घटकेंत खोट्या क्षणांत अस्सल तर क्षणांत,नकली वाटून त्याची हॅम्लेटप्रमाणें अवस्था होते व तो भ्रमांतच गरगरा फिरत रहातो. अशावेळीं मार्ग दाखविणारा तज्ञ

लागतो. खरं रत्न मिळवून देणारा रत्नपारखी लागतो. अध्यात्मांतील तज्ञ रत्नपारखी म्हणजे सद्गुरू होत म्हणून श्री साईसच्चरित्र सांगते—

तरी निवडावी कैसी नकली। भल्या भल्यांची बुद्धि थकली।
जिये लक्षणीं आणावी मुली। ती तंव समजली पाहिजे॥
म्हणोनी सवे लागे पारखी। नकलि कां दिसे खऱ्यासारखी।
हें तो (गुरू) दावील देखा देखी। जाईल शेखी अज्ञान॥

सद्गुरु झाले तरी आपण आपली लायकी सिद्ध करून त्यांना प्रसन्न करून घेतल्या-खेरीज आपणास ते मदत करणार नाहींत यास्तव प्रणीपातेन, परिप्रश्नेन सेवया. त्यांना प्रसन्न करून घेऊं तेव्हा कोटे ते आपणास नकली कोणते हे समजावून देऊन अस्सल आपल्या पदरी पाडतील व सूर्याआड आलेले ढग जाऊन सूर्य आपल्या तेजानें पूर्ण प्रकाशीत असलेला आपल्या दृष्टीस पडेल. म्हणून श्रीकृष्णराणा अर्जुनाला सांगतो

तद्विद्धि प्राणिपातेन, परिप्रश्नेन सेवया।
उपदक्ष्यंति ते ज्ञानं। ज्ञानिन स्तत्त्वदार्शिनः॥
बाबांच्या शब्दांत तिन्ही लेखांचा थोडक्यांत सारांश म्हणजे
सारांश समूळ अज्ञान खाणा। उरें तें ज्ञान सिद्ध जाणा।
ऐसे या श्लोकाचें हृद्गत अर्जुना। श्रीकृष्ण राणा सूचवी॥

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

**महिला वस्तु भांडार**

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**
यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें
लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधानांचे व्यापारी.
**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**
**※ आमची कोठेंही शाखा नाहीं. ※**




## जो जो मज भजे

ज्यांना आपलें नांव प्रसिद्ध व्हावें असें वाटत नाहीं अशा एक भगिनी 'श्री साई मदांकिता' या टोपण नावानें लिहितात कीं,

मी सुमारें १९५० सालापासून श्रीसाईबाबांची भक्त आहे. त्याला कारणहि तसेंच झालें. एखाद्या व्यक्तिला आपल्याकडे खेचून सत्कार्याला लावण्याची बाबांची कुसरी कांहीं वेगळीच. माझ्या बाबतींत अगदी तसेंच घडलें.

मी नुकतीच बाळंतपणांतून उठलें होतें. त्यांतच मला 'प्लुरसी' ( २ बरगड्यांत पाणी झालें )झाली आणि मी इतकी अशक्त दिसत होतें कीं, माझ्या प्रकृतिकडे पाहून कोणीहि नातेवाईक माझ्याजवळ फिरकण्याससुद्धां घाबरत. त्यामुळें मी माझ्या जीवीताशेवर पाणी सोडलें पण बाबांना माझी काळजी होती.

'एक दिवस ह्यांचा ( माझ्या यजमानांचा ) मित्र ह्यांच्या चिंताग्रस्त चेहऱ्याकडे पाहून म्हणाला, 'तुला यांतून सुटण्याचा एकच मार्ग आहे.' नोकरी गेलेली, पत्नी आजारी, मुलगी लहान अशा संकटत्रयींत मार्ग आहे म्हणणारा सांपडतांच ह्यांनी थोडे निराशेनेंच कोणता मार्ग ? म्हणून विचारलें. त्या गुजराथी मित्रानें सांगितले' माझ्याजवळ बाबांची उदी आहे ती लाव. शिवाय घरांत बाबांचा फोटो आण. दर गुरुवारीं हार घालून, उदबत्ती लावून प्रार्थना कर लवकरच तूं मुक्त होशील. त्याप्रमाणें ह्यांनी केले. बाबांचा फोटो घरांत आणल्यावर माझ्या तोंडावरील दुखण्याची छटा दिसेनाशी झाली असें ह्यांना वाटूं लागलें. ह्यांची काळजी थोडी कमी झाली असें वाटूं लागलें. दुसऱ्या दिवशीं त्याच मित्राला फोन आला कीं, तुझ्या मित्राला नोकरी हवी आहे ना ? आणि सुरुवातीला १७५ रु. पगारावर ह्यांना नोकरी लागली. पूर्वीपेक्षां निम्मा पगार कमी मिळत होता. पण बाबांनी त्यांतून निभावून नेलें. व वर्षा दीड वर्षांतच पूर्वीइतका पगार मिळूं लागला. आतां माझी प्रकृति पाहून कोणी ही बाई आजारी होती असें म्हणणार नाहीं. त्यानंतर देखील खूप संकटे आलीं पण बाबांनीं त्यातूनहि वर काढलें.

पण नुकतीचे एकदम दोन संकटें आमच्यावर येऊन गेलीं. माझ्या मुलीला कॉलरा झाला. आणि लघवी वगैरे एकदम बंद पडली. आम्ही दोघेहि अगदीं चिंताक्रांत तशांत घरांत थोरली मुलगी न्युमोनियानें आजारी. त्याचा ताप उतरत नव्हता डॉक्टरची औषधें व इंजक्शनें व इतर उपाय चालू असतांना आम्ही रोज नेमानें उदी लेप व प्राशन चालू ठेवलें होतेंच. ज्यादिवशीं सकाळीं मुलीला कॉलरा झाला.

त्याच दिवशीं तिच्या ओकाऱ्या व जुलाब जरा कमी झाल्यावर जरा काळजीतच दुपारीं २ वाजतां मी थोडी लवंडलें. श्रमानें माझा डोळा लागला. गुरुवार होता त्या दिवशीं. पुढील दृष्टांतानें मी जागी झालें.—आम्ही दोघे बाबांच्या पायांवर डोकें ठेवलें; व वर पहातें तों प्रत्यक्ष बाबाच. तांबूस गोरे पाय, नेहेमीची लोडाला टेकून बसण्याची पद्धत आहे, जशी द्वारकामाईत फोटो आहे तशी. ताजा टवटवीत हार गळ्यांत. मला म्हणाले, “हात पुढें कर.” मी हात पुढें केले. बाबांनी कांहींतरी देण्यासाठीं आपला रिकामा (रिकामा म्हणणें सुद्धां चूक आहे) हात माझ्या हातावर धरला मात्र.—त्यांतून ओंजळभर पारिजातकाची फुले अगदीं टवटवीत माझ्या हातावर पडलीं. मी संतुष्ट नजरेनें पाहीलें. तों पाहतां पाहतां ती फुलें सुकत जाऊन निमिषार्धात त्यांची उदी माझ्या हातावर. मी पुन्हां बाबांकडे पाहिलें. तेव्हां प्रेमानें माझ्या पाठीवर हात फिरवून बाबा म्हणाले. “तुझे कुछ देना बाकी था, वह दिया है। अभी—अच्छा होगा।” असें तीन वेळां म्हणाले. त्यांतच जोरांत घंटा वाजू लागल्या. व मी जागी झालें. त्या दिवसापासूनच घरांतली दुखणी कमी झालीं. माझ्या मनावरचा खूप ताण कमी झाला. प्रत्यक्ष बाबांचें दर्शन झाल्यावर त्यांनीं स्वतः ‘अच्छा होगा’ म्हटल्यावर म्या पामरें काय वाऊगा शीण घ्यावा. आजहि मी अनेक अडचणींत आहें. आजपर्यंत बाबांनीं मला तारलें तसेंच पुढें तेच तारणार आहेत. मी व्यर्थ चिंता कां करत वसूं? माझा व माझ्या पतीचा बाबांवर पूर्ण विश्वास आहे. सांगायचें तात्पर्य एवढेंच कीं कितीहि संकटें आली तरी बाबांवर त्याचा भार घाला. त्यांच्यावर विश्वास ठेवा; नि पहा, माझ्यासारखाच आपल्याला अनुभव येईल बाबा स्वतःच—‘ जो जो मज भजे जैशा जैशा भावें। तैसा तैसा पावे मीहि त्यासी—



# नामदेवांची वाणी

*************************

( अनुवादकः **गणेश विष्णु कविटकर**, एम्. ए. )

:२५:

## पायो हरि नाम सु जीवन मूल

जीवनाचे सर्वस्व असलेले हरिनाम आतां समजले आहे. आणि गुरुदेव भेटल्या मुळें मनाची व्याकुलता दूर झाली आहे. जडीबूटीनें भरलेली जरी थैली असली तरी हरिभजनाशिवाय ती व्यर्थ आहे. जडीबूटीनें जर कार्य झाले असते तर धन्वंतरी वैद्य कां मेले असते ? जडीबूटीच्या सेवनाने मनुष्य जगत नाहीं तर तो हरिनामरुपी अमृताच्या सेवनानेच खरें जीवन जगतो. जडीबूटीवर अवलंबून राहूं नका. कारण जडीबूटी देणाऱ्याचीच पत्नी विधवा होते म्हणजे तोसुद्धां जडीबूटीनें जगूं शकत नाही. नामदेव म्हणतात, हरिनामामृत प्याल्यानें मन प्रफुल्लित झाले , सुफलित झाले , शुद्ध आणि समाधानी झाले.

:२६:

## मनु पंछिया मत्त पड पींजरे

हे मनरूपी पांखरा ! ह्या संसाररूपी पिंजऱ्यांत अडकूं नको. हा संसर मायेनें तुला पकडण्याकरितां पसरलेला सांपला आहे. हे अजाण मना ! संपत्ति ' तारूण्य आणि सौंदर्य यांचा तूं गर्व धरूं नकोस. कारण हा काळ नेहमी खणखणणाऱ्या मृत्यूच्या बेड्या तुला एक दिवस घालणार आहे. मातीच्या कच्च्या घड्यांत भरलेलें पाणी झिरपण्यास कांहींहि वेळ लागत नाहीं. म्हणून हे सज्जन मित्रा ! नामदेव सांगतात ते ऐक तूं साधूंची संगत धर.

: २७ :

## नाच रे मन राम जी के आगै

हे मना ! योग, ज्ञान, भक्ति आणि वैराग्य ह्यांच्या सहाय्यानें तूं प्रभूरामरायासमोर नाच, म्हणजे तूं प्रभूरामचंद्राशीच तद्रूप हो. त्या रामचंद्रासमोर पृथ्वी, आकाश आणि साक्षात् शंकरदेखील कैलास घेऊन नाचतात. ब्रम्हा इंद्र आणि अनेक कला असलेलें रविचंद्र त्यासमोर नाचतात. नारद, अरुण, अक्रुर व हनुमान आपली

## माझा धर्म

**—महात्मा गांधी**

आम्हीं सर्व एका बापाची लेंकरे आहोंत. मग तुम्हीं धर्मानें हिंदु असा, मुसलमान असा, खिस्ती असा किंवा आणखी कोणीहि असा. निरनिराळ्या नांवानें त्या एकमेव भगवंताला आपण ओळखतों. आम्हीं ज्याला ईश्वर म्हणतों त्यालाच मुसलमान अल्ला या नांवानें किंवा खिस्ती लोक खाईस्ट या नांवानें ओळखतात. देवावर आपली संपूर्ण श्रद्धा असली पाहिजे. आपण सर्व एका देवाची लेकरें आहोंत. हें

---

शेपटी घेऊन त्यासमोर नाचतात. म्हणून नामदेव विनवणी करून आपल्या मनाला त्या प्रभू रामचंद्रासमोरच नाचवतात. कारण जो आपले मन त्या रामप्रभुसमोर नाचवेल म्हणजे त्या प्रभुशीं तद्रूप होईल त्याला ते श्रेष्ठपद प्राप्त होईल. आणि तो मुक्त होईल.

**:२८:**

## जहाँ तहाँ मिल्यो सोई

परमेश्वर हा सर्व ठिकाणीं आहे असें कांहीं सांगतात व कांहीं ऐकतात. तो परमेश्वर अभेदांत अभेद म्हणून, भेदांत भेद, सहजांत सहज शेषांत शेष, दुःखांत दुःख, सुखांत सुख, ज्ञानांत ज्ञान, ध्यानांत ध्यान म्हणून राहात आहे. त्या परमेश्वराला पाहिले असें म्हणणें साफ खोटें व त्याला ऐकले आहे असें म्हणणें तर त्याहूनहि खोटें. नामदेव म्हणतात, जे परमेश्वराला अगम्य म्हणतात त्यांना विचारणें किंवा न विचारणें सारखेच आहे.

**: २९ :**

## तूं अगाध वैकुंठनाथा । तेरे चरणों मेरा माथा

हे वैकुंठनाथा ! तूं अगाध आहेस. तुझ्या चरणीं मी माझें मस्तक नम्र करतों. सर्व प्रकारची नानाभूतें पाहतों. त्यांच्याठिकाणीं मी तुलाच पाहतों जेथें जातो तेथें तूं दिसतोस. नामदेव म्हणतात, हीच माझी पूजा. याखेरीज दुसरें परमात्मस्वरूप नाहीं.

———

गृहीत धरल्यानंतर आम्हीं कोणत्याही धर्माचे अनुयायी असलों तरी आम्हीं सर्व बंधु भावच्या नात्यानें एकमेकांशीं बांधलेलें आहोंत हें स्पष्ट झालेंच.

माझा धर्म हिंदुधर्म आहे. आणि तो सर्व मानवजातीचा धर्म आहे. कारण निरनिराळ्या धर्मांत जीं कांहीं महान् व उत्कृष्ट तत्वें आहेत त्या सर्वांचा या धर्मांत समावेश झालेला आहे.

मी कट्टा हिंदु धर्मीय असलो तरी खिस्त मुस्लीम व पारशी धर्मातील तत्वां-बद्दलही मला आदर भाव आहे. त्यापैकी कोणाचाही द्वेष करावा असें मला वाटत नाही सर्वांकडे मी बंधुभावच्या व प्रेमदराच्या भावनेनें मी पहातो व वागतों. कोणीही असो. आपण सहिष्णुता जरूर बाळगली पाहिजे. आम्ही आकुंचितपणा सोडून व्यापक दृष्टीनें सर्वांकडे पाहिलें पाहिजे.

विहिरींत एखादा बेडूक असतो. त्याला वाटत असतें कीं, माझ्या सभोंवरच्या भिंताडापलिकडे जग नाहीं. माझी विहिर हेंच माझें जग. त्या बेडकासारखी आमची स्थिति झालेली आहे. आम्हांला वाटत असतें की आमचा धर्म तेवढाच चांगला. इतर धर्मांत कांहींच राम नाहीं. सत्याचा सारा गड्डा आहे तो आमच्याच धर्मांत परंतु वस्तुस्थीती तशी नाहीं. इतर धर्मांचा आपण अभ्यास केला तर आपणास आढ-ळून येईल कीं प्रत्येक धर्मांत कांहीं ना कांहीं उत्तमोत्तम तत्वें आहेतच. मात्र प्रत्येक धर्मांत कांही ना कांही उणीवाही आहेतच.

तेव्हां आपण आपल्या धर्माला ज्याप्रमाणें पूज्य मानतों त्याचप्रमाणें इतर धर्मांबद्दल्ही आपण प्रेमादरभाव बाळगला पाहिजे.

मी सर्वांवर प्रेम करावें. केवळ हिंदवासीयांवरच नाही तर जगांतील सर्व धर्मांच्या लोकांवर प्रेम करावें.असें झालें,आमच्या ठायीं परधर्म सहिष्णुता व परस्परांबद्दल बंधुभाव निर्माण झाला; म्हणजे जगांत आपोआप शांतता नांदू लागेल. व हें जग सुखासमाधानानें नांदण्यास योग्य होईल.

या देशांत नाना धर्मांचे व श्रध्देचे लोक आहेत. या सर्वांशीं आम्ही प्रेमानें व बंधुभावाने वागले पाहिजे.



# कर्मयोगाचा अनुभवसिद्ध महिमा

—संत विनोबा

मला लक्ष्मीची गोष्ट आठवते. तिचें होतें स्वयंवर. सारे देव-दानव आशेनें आले होते. लक्ष्मीनें पण जाहीर केला नव्हता. सभामंडपांत ती आली आणि म्हणाली, "ज्याला माझी इच्छा नसेल त्याला मी माळ घालणार आहें." ते तर सारे लाल-चावलेले होते. मग लक्ष्मी निरिच्छ वर शोधीत निघाली. शेषावर शांत पडलेली भगवान् विष्णूची मूर्ति तिला दिसली. विष्णूच्या गळ्यांत माळ घालून त्याचे चरण चुरीत ती अद्याप बसलीच आहे. "**न मागे तयाची रमा होय दासी**" हीच तर खुबी आहे.

सामान्य मनुष्य आपल्या फळाभोंवतीं कुंपण घालतो. अनंत मिळणारें फळ अशामुळें तो गमावून बसतो. सांसारिक मनुष्य अपार कर्म करून अल्प फळ मिळवितो, आणि कर्मयोगी थोडेंसें करूनहि अनंतपट मिळवितो. हा फरक केवळ एका भावनेनें होतो. टॉल्स्टॉयनें एके ठिकाणीं लिहिलें आहे, "लोक खिस्ताच्या त्यागाची स्तुति करतात. परंतु हे सांसारिक जीव रोज किती रक्त आटवतात, आणि काबाडकष्ट करतात! पक्क्या दोन गाढवांचा भार पाठीवर घेऊन आटाआटी करणारे हे सांसारिक जीव, यांना खिस्तापेक्षां किती अधिक कष्ट, खिस्तापेक्षां किती अधिक यांचे हाल! ह्याच्या निम्मे कष्ट आणि हाल जर हे देवासाठीं सोसतील तर खिस्ताहून मोठे होतील."

सांसारिक मनुष्याची तपस्या मोठी असते; परंतु ती क्षुद्र फळासाठीं असते. जशी वासना तसें फळ. आपल्या वस्तूंची जी आपण किंमत करूं, तिच्यापेक्षां त्या वस्तूची अधिक किंमत जगांत होत नसते. सुदामदेव भगवंताकडे पोहे घेऊन गेले. त्या मूठभर पोह्यांची किंमत पैहि नसेल. परंतु सुदाम्याला ते अमोल वाटत होते. त्या पोह्यांच्या मागें भक्तिभाव होता. ते मंतरलेले पोहे होते. त्या पोह्यांच्या कणाकणांत भावना होती. लहानशी वस्तु, परंतु मंत्रानें तिचें मोल, सामर्थ्य वाढतें. नोटेचें वजन कितीसें असेल? शिलगवली तर थेंबभरहि पाणी तापणार नाहीं. परंतु त्या नोटेवर शिक्का असतो. त्या शिक्यामुळें तिची किंमत.

कर्मयोगांत हीच सारी खुबी आहे. कर्म हें नोटेप्रमाणें आहे. भावनेच्या शिक्क्याला किंमत आहे. कर्माच्या कपट्याला नाहीं. मी हें एक प्रकारें मूर्तिपूजेचेंच रहस्य सांगत आहें. मूर्तिपूजेच्या कल्पनेंत फार सौंदर्य आहे. या मूर्तीचे कोण तुकडे

करील? ही मूर्ति प्रथम तुकडाच होती. मीं तिच्यांत प्राण ओतला, माझी भावना ओतली. या भावनेचे का तुकडे करतां येतात? तुकडे दगडाचे होतात, भावनेचे नाहीं. मी माझी भावना जेव्हां मूर्तीतून काढून घेईन तेव्हांच तेथें दगड उरेल व मग त्याचे तुकडे उडतील.

## आईच्या पत्राची मातब्बरी

कर्म म्हणजे दगड, कपटा, चिटोरें, आईनें वेड्यावांकड्या चार ओळी कपट्यावर लिहून पाठविल्या, आणि दुसऱ्या कोणीं पन्नास पानांचें सटरफटर पुडकें लिहून पाठविलें, तर वजन कशाचें अधिक? आईच्या त्या चार ओळींत जो भाव आहे तो अमोल आहे, पवित्र आहे. त्याची सर त्या दुसऱ्या रद्दीला येणार नाहीं. कर्मांत ओलावा हवा. भावना हवी. आपण मजुराच्या कामाची किंमत करतों व हे पैसे घेऊन जा असें म्हणतों. परंतु दक्षिणेचें तसें नाहीं. दक्षिणा भिजवून द्यावी लागते. दक्षिणा किती दिली हा प्रश्न नाहीं. त्या दक्षिणेंत ओलावा आहे का, ही महत्त्वाची वस्तु आहे. मनुस्मृतींत मोठी मौज केली आहे. बारा वर्षें गुरुगृहीं राहून पशूचा मनुष्य झालेला शिष्य. त्यानें गुरूला काय द्यावें? पूर्वी आर्यों फी घेत नसत. बारा वर्षें शिकल्यावर जें द्यावेंसें वाटेल तें द्यावें अशी पद्धत होती. मनु सांगतात, "दे गुरूला एखादें फूल, एखादा पंखा, एखादा खडावांचा जोड, एखादा पाण्यानें भरलेला कलश." ही कांहीं थट्टा नाहीं. जें द्यावयाचें तें श्रद्धेचें चिन्ह म्हणून द्यावयाचें. फुलाला वजन नाहीं. परंतु त्यांतील भक्तीला ब्रह्मांडाचें वजन आहे.

**"रुक्मिणीनें एक्या तुळसीदळानें गिरिधर प्रभु-तुळिला।"**

सत्यभामेच्या खंडीभर दागिन्यांनीं काम झालें नाहीं. परंतु भावभक्तीनें भरलेलें एक तुळशीपत्र रुक्मिणीमातेनें पारड्यांत घालतांच सारें काम झालें. तें तुळशीपत्र मंतरलेलें होतें. तें साधें राहिलें नव्हतें. कर्मयोग्याच्या कर्माचें असेंच आहे.

## अशी ही गंगामाई!

गंगेवर दोन माणसें स्नानासाठीं गेलीं आहेत अशी कल्पना करा. त्यांतील एक जण म्हणतो, "गंगा गंगा म्हणजे काय? दोन भाग हायड्रोजन आणि एक भाग ऑक्सिजन असे दोन वायु एकत्र केलें कीं झाली गंगा." दुसरा मनुष्य म्हणतो, "भगवान् विष्णूच्या पदकमलांतून ही निघाली, शंकराच्या जटाजूटांत राहिली, हजारों ब्रह्मर्षींनीं आणि राजर्षींनीं हिच्या तीरावर तपश्चर्या केली, अनंत पुण्यकृत्यें हिच्या कांठीं घडलीं; अशी ही पवित्र गंगामाई." या भावनेनें ओला होऊन तो स्नान करतो. तो ऑक्सिजन हायड्रोजनवालाहि स्नान करतो. देहशुद्धीचें फळ दोघांना मिळालेंच परंतु त्या भक्ताला देहशुद्धीबरोबर चित्तशुद्धीचेंहि फळ मिळालें. गंगेंत

बैलालाहि देहशुद्धि मिळेल. अंगाची घाण जाईल. परंतु मनाची घाण कशी जाणार ? एकाला देहशुद्धीचें तुच्छ फळ मिळालें. दुसऱ्याला हें फळ मिळून शिवाय चित्त-शुद्धीचें अमोल फळ मिळालें.

सूर्याला स्नान करून नमस्कार घालणाऱ्याला व्यायामाचें फळ मिळेलच. परंतु तो नमस्कार आरोग्यासाठीं घालीत नाहीं, उपासनेसाठीं घालतो. त्यामुळें शरीराला आरोग्य लाभतेच, परंतु त्याच्या बुद्धीची प्रभाहि फांकते. आरोग्याबरोबर स्फूर्ति व प्रतिभाहि त्याला सूर्यापासून मिळेल.

कर्म तेंच. परंतु भावनाभेदामुळें अंतर पडतें. परमार्थी मनुष्याचें कर्म आत्म-विकासक होतें. संसारी मनुष्याचें कर्म आत्मबंधक ठरतें. कर्मयोगी जो शेतकरी असेल तो शेती स्वधर्म म्हणून आचरील. त्यामुळें त्याच्या पोटाला मिळेलच. परंतु पोटाला मिळावें म्हणून तें कर्म तो करणार नाहीं. शेती करतां यावी म्हणून खाणें तो साधन मानील. स्वधर्म हें त्याचें साध्य व खाणें साधन. परंतु दुसऱ्या शेतकऱ्याच्या बाबतींत पोटाला मिळणें हें साध्य व शेतकीचा स्वधर्म हें साधन असे होईल. अशी ही उलटापालट असते.

गीतेंत स्थितप्रज्ञाच्या लक्षणांत हें गमतीनें सांगितलें आहे. इतरांची जेथें जागृति तेथें कर्मयोगी निद्रित असतो. इतरांची जेथें निद्रा तेथें कर्मयोगी जागृत राहतो. आपण पोटाला मिळतें का नाहीं यासाठीं जागृत राहूं, तर कर्मयोगी कर्मावांचून एक क्षण नाहीं ना गेला या बाबतींत जागृत राहील. तो खातो. या मडक्यांत कांहीं तरी ओतलेंच पाहिजे म्हणून ओततो. सांसारिकाला जेवतांना आनंद होतो, योगी पुरुषाला जेवतांना कष्ट होतात. म्हणून तो मिटक्या मारीत जेवणार नाहीं. संयम राखील. एकाची रात्र तो दुसऱ्याचा दिवस. एकाचा दिवस ती दुसऱ्याची रात्र म्हणजे एकाचा जो आनंद तें दुसऱ्याचें दुःख, आणि एकाचें जें दुःख तो दुसऱ्याचा आनंद; असा हा अर्थ आहे. सांसारिक आणि कर्मयोगी दोघांचीं कर्में तींच. परंतु कर्मयोगी फलासक्ति सोडून कर्मांतच रमतो ही मुख्य गोष्ट आहे. सांसारिकाप्रमाणेंच योगीहि खाईल, झोंप घेईल, परंतु त्यासंबंधींची त्याची भावना निराळी राहील.

## दिव्य भावनेचा आनंद

सांसारिक पुरुष व कर्मयोगी यांच्या कर्मांतील साम्य व वैषम्य तेव्हांच दिसून येतें. कर्मयोगी समजा गोरक्षणानें काम करीत आहे. तें कोणत्या दृष्टीनें करील ? गाईंची सेवा केल्यानें समाजाला भरपूर दूध देऊं, मनुष्याहून खालीं असलेली पशुसृष्टि तिच्याशीं गाईच्या निमित्तानें तरी प्रेमाचा संबंध जोडूं; अशा भावनेनें तो गोरक्षण

करील, पगार मिळावा म्हणून नाहीं करणार. पगार तर मिळेल; परंतु आनंद या दिव्य भावनेचा आहे.

कर्मयोग्याचें कर्म त्याला विश्वाशीं समरस करीत असतें. तुळशीच्या झाडाला पाणी घातल्याशिवाय जेवावयाचें नाहीं. वनस्पति-सृष्टीशीं जोडलेला हा प्रेमसंबंध आहे. तुळशीला उपवासी ठेवून मी का आधीं जेवूं ? गाईशीं एकरूपता, वृक्ष-वनस्पतींशीं एकरूपता, असें करीत करीत विश्वाशीं एकरूपता अनुभवावयाची. भारतीय युद्धांत सायंसमय होतांच सारे संध्या वगैरे करावयास जात. परंतु भगवान् श्रीकृष्ण रथाचे घोडे सोडून त्यांना पाण्यावर नेत, त्यांचा खरारा करीत, त्यांच्या अंगांतील शल्यें काढीत. किती त्या सेवेंत भगवंतांचा आनंद ! कवीला हें वर्णन करणें पुरें वाटत नाहीं. पीतांबरांत चंदी घेऊन घोड्यांना देणारा तो पार्थसारथि डोळ्यांसमोर आणा. कर्मयोगांतील आनंदाची कल्पना समजून घ्या. प्रत्येक कर्म जणूं आध्यात्मिक. उच्चतर परमार्थिक कर्म. खादीचें काम घ्या. खांद्यावर खादीचीं गांठोडीं घेऊन वणवण करणारा कंटाळतो का ? नाहीं. **अर्धपोटी कोट्यावधि बंधु-भगिनी आहेत त्यांना घांस द्यावयाचा आहे, या कल्पनेत तो मस्त असतो. त्याचे तें वारभर खादी खपविणें सर्व दरिद्रनारायणाशीं जोडलेलें असतें.**

**कर्मयोगाचीं विविध प्रयोजनें**

निष्काम कर्मयोगांत अद्‌भुत सामर्थ्य आहे. त्या कर्मामुळें व्यक्तीचें व समा-


MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934 *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to You—A Satisfaction to Us

Chemical Cleaners, Super Fine Darners

Master Dyers

*FOR*

Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम व्यवस्थित करणार

माटुंगा क्लीनिंग वर्क्स

स्थापना १९३४ ) मोदी निवास, मुंबई १९ ( मालक : एस्. व्ही. प्रधान

जाचें परमकल्याण होतें. स्वधर्माचरण करणाऱ्या कर्मयोग्याची शरीरयात्रा तर चालतेच, परंतु नेहमीं उद्योगांत असल्यामुळें शरीर निरोगी व स्वच्छ राहते. आणि त्याच्या त्या कर्मामुळें ज्या समाजांत तो राहतो त्या समाजाचाहि योगक्षेम नीट चालतो कर्मयोगी शेतकरी पैसे अधिक मिळतील म्हणून अफू व तंबाखू पेरणार नाहीं. स्वतःचें तें कर्म तो समाजाच्या मंगलाशीं जोडीत असतो. स्वधर्मरुप कर्म समाजाच्या कल्याणाचेंच होईल. माझे व्यापाराचें कर्म जनतेच्या हितासाठीं आहे असें मानणारा व्यापारी, परदेशी कापड विकणार नाहीं. त्याचा व्यापार समाजोपकारक होईल. स्वतःला विसरून आजूबाजूच्या समाजाशीं समरस होणारे असे कर्मयोगी ज्या समाजांत निपजात त्या समाजांत सुव्यवस्था, समृद्ध आणि सौमनस्य राहतें.

कर्मयोग्याच्या कर्मामुळें त्याची शरीरयात्रा चालून देह व बुद्धी सतेज राहतात आणि समाजाचेंहि कल्याण होतें. या दोन फळांशिवाय चित्तशुद्धीचेंहि महान् फळ त्याला मिळते. "**कर्मणा शुद्धी**" असें म्हटलें आहे. कर्म चित्तशुद्धीचें साधन आहे परंतु तें सर्व लोक करतात तें नाहीं. **कर्मयोगी जें मंतरलेलें कर्म करतो, त्यानें चित्तबुद्धी मिळते.** महाभारतांत तुलाधार वैश्याची कथा आहे. जाजलि नांवाचा एक ब्राह्मण तुलाधाराकडे ज्ञानासाठीं जातो. तुलाधार त्याला म्हणतो, "बाबा रे, या तराजूची दांडी नेहमीं सरळ ठेवावी लागते." तें बाह्य कर्म करतांना तुलाधाराचें मनहि सरळ झालें. लहान मूल दुकानांत येवो कीं मोठा माणूस येवो. दांडीचें एकच रूप. खाली वर कांहीं नाहीं. उद्योगाचा मनावर परिणाम होतो. **कर्मयोग्याचे कर्म म्हणजे एक प्रकारचा जपच तो** त्यांतून त्याला चित्तशुद्धि मिळतें आणि मग निर्मळ चित्तांत ज्ञानाचें प्रतिबिंब उमटतें. त्या त्या कर्मांतून ते ते कर्मयोगी शेंवटीं ज्ञान मिळवितात. तराजूच्या दांडीतून तुलाधाराला समवृत्ति मिळाली. सेना न्हावी डोई करी. दुसऱ्यांच्या डोक्यांतला मळ काढतां काढतां सेना न्हाव्याला ज्ञान झालें. "मी दुसऱ्यांच्या डोक्यांतील मळ काढतो आहें; परंतु माझ्या डोक्यांतला, माझ्या बुद्धींतला, मळ काढला आहे का?" अशी आध्यात्मिक भाषा त्याला त्या कर्मांतून स्फुरूं लागली. शेतांतील माजलेले तण उमटतां उमटतां हृदयांतील वासना विकारांचें तण उमटण्याची कर्मयोग्याला बुद्धि होते. माती तुडवून समाजाला पक्के मडकें देणारा गोरा कुंभार आपल्या जीवनाचेंहि पक्कें मडकें केलें पाहिजे अशी खूणगांठ मनांत बांधतो. हातांत थापटणें घेऊन "मडकीं कच्चीं कीं पक्कीं" अशी संतांची परिक्षा घेणारा तो परीक्षक बनतो. त्या त्या कर्मयोग्यांना त्या त्या धंद्यांतील भाषेंतूनच भव्य ज्ञान प्राप्त झालें. तीं कर्में म्हणजे त्यांच्या अध्यात्मशाला होत्या. तीं त्यांचीं कर्में उपासनामय, सेवामय होतीं. तीं दिसावयास व्याव-

इरिक परंतु अंतरी आध्यात्मिक होती.

## आणखी एक उत्तम फळ

कर्मयोग्याच्या कर्मापासून आणखी एक उत्तम फळ मिळतें. तें म्हणजे समाजाला आदर्श लाभतो. समाजांत आधीं जन्मलेले, असा भेद तर आहेच. आधीं जन्मलेल्यांनी मागून जन्मलेल्यांस घडा घालून द्यावयाचा असतो. मोठ्या भावानें लहान भावास, आईबापांनीं मुलांस, पुढाऱ्यानें अनुयायास, गुरुनें शिष्यास, कृतीनें उदाहरण घालून द्यावयाचें असतें. असें उदाहरण कर्मयोग्याशिवाय कोण घालून देणार ?

कर्मयोगी कर्मातच आनंद मानणारा असल्यामुळें सदैव कर्म करीत राहतो त्यामुळें समाजांत दंभ माजत नाहीं. कर्मयोगी स्वयंतृप्त असतो. तरीहि कर्म केल्याशिवाय राहत नाहीं. तुकाराम म्हणतात, "भजनानें देव मिळाला म्हणून का भजन सोडूं ? भजन आतां आमचा सहज-धर्म झाला."

**"आधीं होता संतसंग। तुका झाला पांडुरंग**
**त्याचें भजन राहीना। मूळस्वभाव जाईना"**

कर्माच्या शिडीवर चढून शिखर गांठलें; परंतु कर्मयोगी शिखर गांठल्यावरहि ही शिडी सोडीत नाहीं. त्याला सोसवतच नाहीं. त्याच्या इंद्रियांना त्या कर्मांचें सहज वळणच पडून जातें. अशा रीतीनें स्वधर्मकर्मरूप सेवेच्या शिडीचें महत्त्व तो समाजाला पटवीत राहतो.

समाजांतील दंभ दूर होणें ही फारच मोठी वस्तु आहे. दंभानें समाज बुडतो. ज्ञानी स्वस्थ बसला तर त्याचें पाहून इतरहि स्वस्थ बसूं लागतील. ज्ञानी नित्यतृप्त असल्यामुळें अंतरीं सुखानें डोलत स्वस्थ बसेल; परंतु दुसरा मनांत रडत असून कर्मशून्य होईल. एक अंतरतृप्त असून स्वस्थ आहे, दुसरा मनांत कुंथत असून स्वस्थ आहे, अशी स्थिति भेसूर आहे. यानें दंभ बळावेल. म्हणून सारे संत शिखर गांठूनहि साधनाची उत्कटपणें कास धरून राहिले. आमरण स्वकर्माचें आचरण करीत राहिले. आई मुलींच्या बाहुलाबाहुलीच्या खेळांत रस घेते. हें लुटपुटीचें आहे असें समजुन हि त्या मुलींच्या खेळांत भाग घेऊन ती गोडी उत्पन्न करते. आई जर त्या खेळांत दाखल होणार नाहीं तर मुलींना गोडी वाटणार नाहीं. कर्मयोगी तृप्त होऊन जर कर्म सोडील तर दुसरे अतृप्त असूनहि कर्में सोडतील; परंतु मनांत उपाशी व निरानंद राहतील.

म्हणून सामान्य माणसाप्रमाणेंच कर्मयोगी कर्म करीत राहतो. मी म्हणजे कोणी विशेष असें तो मानीत नाहीं. इतरापेक्षां अनंतपट तो बाहेर राबतो. अमुक

एक कर्म पारमार्थिक असा कांहीं शिक्का मारावयाचा नसतो. कर्मांची जाहिरात द्यावयाची नसते. उत्कृष्ट ब्रह्मचारी असशील तर तुझ्या कर्मांत इतरांच्यापेक्षां शतपट उत्साह दिसूं दे. कमी आहार मिळाला तरी तिप्पट काम होऊं दे. समाजाची सेवा तुझ्या हातून अधिक घडूं दे. तुझें ब्रह्मचर्य कृतींत दिसूं दे. चंदनाचा सुगंध बाहेर सुटूं दे.

सारांश, कर्मयोगी फळाची इच्छा सोडून अशीं हीं अनंत फळें मिळवील. त्याची शरीरयात्रा चालेल, शरीर व बुद्धि सतेज राहतील, ज्या समाजांत तो वावरतो समाज सुखी होईल, त्याला चित्तशुद्धि लाभून ज्ञान मिळेल, आणि समाजांतील दंभ टळून जीवनाचा पवित्र आदर्श प्रगटेल. असा हा कर्मयोगाचा अनुभवसिद्ध महिमा आहे.

**कर्मयोग-व्रतांतील अन्तराय**

कर्मयोग्याचें कर्म इतरांपेक्षां उत्कृष्ट केलेलें असेल. कर्म हीच उपासना कर्म हीच पूजा. मी देवाची पूजा केली. त्या पूजेचा नैवेद्य प्रसाद म्हणून घेतला. परंतु तो नैवेद्य हें का त्या पूजेचें फळ? जो नैवेद्यासाठीं पूजा करील त्याला तो प्रसादाचा तुकडा ताबडतोब मिळेलच. परंतु कर्मयोगी त्या पूजा-कर्मानें परमेश्वरदर्शनाचें फळ मागत असतो. नैवेद्य खावयास मिळणें, इतकी अल्प किंमत त्या कर्माची तो करीत नाहीं. आपल्या कर्माची किंमत कमी आंखावयास तो तयार नाहीं. स्थूल दृष्टि, त्याला स्थूल मापानें तो आपलें कर्म मापीत नाहीं. ज्याची स्थूल दृष्टि, त्याला स्थूल फळ. शेतीमध्यें एक म्हण आहे, खोली पेर, पण ओली पेर." खोल नांगरून मागणार नाहीं, खोलीं ओलहि हवी. खोली व ओली दोन्ही असतील तर कणसें मनगटासारखीं येतील. कर्म खोल म्हणजे उत्कृष्ट केलेलें


# ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

**२६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८५४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रीटेलर्स**

असावें. शिवाय त्यांत ईश्वरभक्तीची, ईश्वरार्पणतेची ओलीही असावी. कर्मयोगी खोल कर्म करून ईश्वराला अर्पण करतो.

आपल्यामध्यें परमार्थाच्या वेडगळ कल्पना उपन्न झाल्या आहेत. जो परमार्थी आहे त्यानें हातपाय हालवायचे नाहीत, कामधाम करावयाचें नाहीं, असें लोकांना वाटतें. जो शेती करतो, खादी विणतो, तो कसचा परमार्थी ? असें विचारतात. जो जेवतो तो कसचा परमार्थी ? असें मात्र कधीं विचारीत नाहींत ! कर्मयोग्यांचा परमेश्वर तर खरारा करीत उभा आहे. राजसूय यज्ञाचे वेळेस शेणगोळा हातांत घेऊन उष्टीं काढीत आहे. रानांत गाई चारावयास नेत आहे. द्वारकेचा राणा पुन्हा कधीं गोकुळांत गेला तर पांवा वाजवीत गाई चारी. असा हा घोडे खाजविणारा, गाई चारणारा, रथ हांकणारा, शेण लावणारा, कर्मयोगी परमेश्वर संतांनीं उभा केला आहे. आणि संत हि कोणी शिंपीकाम तर कुंभारकाम, विणकाम, तर माळीकाम, दळण्याचें काम तर वाण्याचें काम; न्हाव्याचें काम तर ढोरे ओढण्याचें काम करीत मुक्त झाले आहेत.

---

## "हेंची दान देगा साई"

हेंची दान देगा साई
माझा भाव तुझ्या ठाई ! ॥ ध्रु ॥
तूंच माझा माता पिता !
तुझ्या वीण नाहीं त्राता !
तूंच घरी मजला हाता !
दावी मार्ग शिरडीनाथा ! ॥१॥
साई वीण दैवत नाहीं !
लागा सर्व त्यांचे पायीं !
बोला मुखीं साई, साई !
इडा पीडा दूर जाई ! ॥२॥

कवी:—सखाराम र. बोन्द्रे

[भेडशी.]

—:०:—

# देवाजवळ मोक्षाचें गाठोडें नाहीं

नाही देवापाशी मोक्षाचें गांठोळें ।
आणूनि निराळें द्यावें हाती ॥ १ ॥
इंद्रियाचा जय साधूनिया मन ।
निर्विषय्र कारण असे तेथें ॥ २ ॥
उपास पारणी अक्षरांची आटी ।
सत्कर्मा असे शेवटी फळ ॥ ३ ॥
आदरें संकल्प वारी अतिशय ।
सहज ते काय दुःख जाण ॥ ४ ॥
स्वप्नींच्या घायें विवळसी वांयां ।
रडें रडतियासावें मिथ्या ॥ ५ ॥
तुका म्हणे फळ आहे मुळापाशी ।
शरण देवासी जाय वेगी ॥ ६ ॥

तुकाराबावांनीं, दुसरें त्यांचे हजारों अभंग आहेत ते केले नसते तर या अभगांनीं त्यांची सत्कीर्ति वाढली असती, आणि त्यांचे आपल्या लोकांवर मोठे उपकार झाले असते. आज पहिल्या अभंगाच्या तीन चरणांचा दुसऱ्या अभंगास जोडीला घेऊन, विचार करावयाचा आहे. तीर्थयात्रा, यज्ञयाग, तप व दानधर्म, हीं करून स्वर्गवास प्राप्त करून घेण्याची ज्यांस उत्कटेच्छा असते, त्यांच्या मनांत स्वर्गवास व तेथील भोग यांविषयीं विरसता आणवीन, आणि त्यांच्या व ब्रम्हरूप होऊं पाहणाऱ्या ब्रह्मज्ञान्यांच्याकडून आपला जन्म व्यर्थ गेला असें म्हणवीन व तुकारामांसारख्यांचा जन्म आपल्या देशीं झाला म्हणून आम्ही धन्य आहों असेंही म्हणवीन, अशी दुसऱ्या अभंगांत तुकारामबाबांनी प्रतिज्ञा केली आहे. हिचा संबंध मरणोत्तरस्थितीविषयीं आपल्या देशांत ज्या दोन कल्पना आहेत त्यांच्याशीं आहे. एक कल्पना स्वर्गवासाची, व दुसरी आत्मस्थितीची अथवा मुक्तीची. ही दुसरी कल्पना, ज्ञानमार्ग्यांची. त्यांचें मत असें आहे कीं, आत्मा नित्य, शुद्ध बुद्ध व मुक्त आहे. आपली सहजस्थिति ज्ञानाची, मुक्ततेची व शुद्धीची असून अज्ञान, अविद्या इत्यादि अनेक अडचणींमुळें आपणांस तिचा विसर पडतो. ही सहजस्थिति अथवा आत्मस्थिति पुनः प्राप्त झाली असतां मनुष्य मुक्त होतो, म्हणजे आपल्या परमात्मतत्वाचा त्यास अनुभव यतो. अन्य लोकांत हा विचार नाहीं व ही समजूतही नाहीं.

या ज्ञानमार्गांचें अवलंबन करून जे पैलतीरास गेले त्यांच्याकडून आपली चुकी झाली हे सोडून दिलें असतें तर बरें होतें असें म्हणवीन, असें तुकोबांनीं म्हटलें आहे. स्वर्गवासाची कल्पना अशी आहे कीं, जप. तप, तीर्थयात्रा, दानधर्म, पुरश्चरणें वगैरे या मृत्युलोकीं केली असतां येथील यातना, क्लेष, दैन्य, पाप यांतून सुटून नाना-प्रकारचें सुखभोग जेथें मिळतात अशा लोकांत अथवा वसतिस्थानीं मनुष्य मरणोत्तर जातो. ह्याच कल्पनेची प्रवृत्ति अधिक आहे. या दोन मार्गांच्या बाहेर, तृतीयपंथ काढणें तर तुकारामबावांसारखा ज्यांचा अधिकार, ज्यांची योग्यता त्यांनींच करावें.

मोक्षाच्या संबंधानें साधारण लोकांच्या समजुतीस अनुलक्षून मोक्ष म्हणून एक निराळी द्रव्याची पोतडी आहे आणि कांहीं तरी आपल्या मनाजोगा मोबदला घेऊन देव तें आपल्या स्वतःपाशीं जतन करून ठेविलेले मोक्षाचें गांठोडें देतो, अथवा मनुष्याकडून देवास कोणत्या तरी प्रकारचा मोबदला मिळाला असतां त्याच्या पद-रांत माप घालावयाचे तें मोक्ष, असें मानणें केवळ भ्रमात्मक आहे, असें सांगून दुसऱ्या चरणांत मोक्षाचें खरें स्वरूप, म्हणजे इंद्रियांवर आपला पगडा बसवून त्यांस सर्वपरी आपल्या हुकमांतलीं करून मन निर्विषय किंवा निर्वासन करणें हेंच होय, असें म्हटलें आहे. पहिल्या अभंगाच्या तिसऱ्या चरणांत उपासपारणीं व अक्ष-रांची आटी अथवा विद्या, ज्ञान संपादन करण्याची खटपट हीं जीं अनुक्रमें कर्म-मार्ग्यांची व ज्ञानमार्ग्यांचीं साधनें त्यांस उद्देशून परिणामीं सत्कर्मांनींच खरें स्वहित साधतें, असा उपदेश तुकारामबावांनीं केला आहे; उपासपारणी, योगसाधन, ज्ञानप्राप्ती हीं सर्वथैव निरुपयोगी आहेत; त्यांच्या भरीस मुळींच पडूं नये; तीं सर्वांनीं त्याज्य म्हणून टाकून द्यावीं, असें म्हणण्याचा भाग नाहीं; परंतु त्यांच्या योगानें सत्कर्मांकडेस प्रवृत्ति होत असली, तरच त्यांत हांशील, हें निरंतर ध्यानांत ठेवून, तीं खुशाल करावीं. सरकारची इमानेंइतबारें चाकरी केली अथवा कामगिरी बजावली, तर त्याचा मोबदला जहागीर, पालखी, किताब वगैरे रूपानें मिळत असतो; तसा यज्ञयाग, उपासपारणीं केलीं म्हणजे तेवढ्यानेंच देवाकडून मोक्ष देण्यांत येतो हा समज चुकीचा आहे. मरणोत्तर प्राप्त होणारी मोक्ष ही वस्तु अथवा स्थिति नसून, ती याच जन्मांत स्वतः साध्य करून घेण्यासारखी आहे, हेंच तुकारामबावांचें सांगणें आहे. सर्वदा सत्यसंकल्प व सुविचार मनांत उत्पन्न होणें आणि विकल्पांस व कुवासनांस त्यांत रिघावयास अवसर न मिळणें, तसेंच सदाचरणाविषयीं दृढ निश्चय ढळूं न देणें व सदुद्योगाविषयीं तत्परता शिथिल न होणें याच मुक्तीच्या निरनिराळ्या पायऱ्या आहेत. परमेश्वराच्या ज्योतींत आपली ज्योति मिळवायाची, अथवा मरणोत्तर दुसऱ्या लोकांत वास करून अप्सरा म्हणा, परी म्हणा, ह्यांची प्राप्ति साधावयाची किंवा इतर शारीरिक सुखसाधनें यांचा उपभोग घ्यावयाचा, हाच पुरुषार्थ मानून तदर्थ साधनें करावी, म्हणजे इष्टार्थ प्राप्त होतो हा समजुतीचा भाग चुकीचा आहे. इतकेंच

नव्हे, तर हानिकारक आहे. साधनांत दोष आहे. किंवा ती यथार्थ नाहींत असें नाहीं. पण खरी सिद्धि, खरें फळ शेवटीं सत्कर्मामध्येंच आहे, याची विस्मृति पडतां कामा नये. साधनामध्येंच मनुष्य गढून गेला म्हणजे सत्यसंकल्पाची व सदाचरणाविषयीं निश्चय दृढतर होण्याची आवश्यकता आहे हें नजरेंतून चुकतें आणि बिघड होतो.

